RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क
मो. 8482839451

सोमवार, ०९ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १६२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Monday, 09 June 2025 | Year : 5 | Issue : 162 | Daily | Rate: Rs. 5/-

## मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार...

**मणिपूरच्या खोऱ्यातील जिल्ह्यांमध्ये मीतेई संघटनेच्या नेत्यासह अनेक जणांना अटक**

**निदर्शकांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला, पोलिसांशी हिंसक संघर्ष**

**पाच जिल्ह्यांमध्ये इंटरनेटवर बंदी घातली**





**इम्फाळ :** मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उफाळून आला आहे. शनिवारी अनेक जिल्ह्यांमध्ये हिंसाचार उसळला, त्यानंतर प्रशासनाने बिष्णुपूर जिल्ह्यात कफ्यू लागू केला आणि शनिवारी रात्री मेतेई संघटनेच्या नेत्या अरामबाई टेंगोल आणि इतर अनेक नेत्यांना पोलिसांनी अटक केल्यानंतर हिंसाचार सुरू झाला. निदर्शकांनी रस्त्यांवर आग लावली, बसेस जाळल्या, मालमत्तेची तोडफोड केली. त्यानंतर हिंसक संघर्ष सुरू झाला.

आंदोलकांनी प्रशासनाला स्वतःवर पेट्रोल ओतून आत्मदहन करण्याची धमकी दिली. याचा एक व्हिडिओही समोर आला आहे, यामध्ये अनेक आंदोलक उभे राहून स्वतःवर पेट्रोल ओतत असल्याचे दिसत आहे. शनिवारी रात्री उशिरा अरंबाई टेंगगोल यांना अटक केल्यानंतर इम्फाळ पूर्व आणि पश्चिम जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली. त्यानंतर, राजधानी इम्फाळच्या अनेक भागात निदर्शकांचे पोलिसांशी संघर्ष झाला. इम्फाळच्या खुराई लामलोंग भागात, निदर्शकांच्या संतप्त जमावाने बस जाळल्या, टायर जाळून रस्ते अडवले आणि सुरक्षा दलांशी संघर्ष केला. निदर्शक इथेच थांबले नाहीत तर ते इंफाळ विमानतळाच्या तुलिहाल गेटबाहेर जमले. निदर्शकांनी रात्री विमानतळ रस्त्यावरील वाहतूक रोखली त्यांनी तिथेच रात्र काढली.

राजधानीत वाढत्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी बळाचा वापर केला आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. यादरम्यान, लाठीचार्जमध्ये जखमी झालेल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर, बिष्णुपूर जिल्ह्यात संपूर्ण संचारबंदी लागू करण्यात आली आहे. तर इंफाळ पूर्व, इंफाळ पश्चिम, थौबल आणि काकचिंगमध्ये पाचपेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली आहे.

## व्हाइट हाऊसमध्ये हाणामारी?



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि उद्योगपती एलॉन मस्क यांच्यात गेल्या काही दिवसांत दुरावा निर्माण झाला आहे. इतकेच नव्हे, तर दोघांनीही आक्रमक होत सोशल मीडियावर एकमेकांवर जोरदार टीका आणि गंभीर आरोप केले आहेत. हा सर्व प्रकार सुरू असताना आता व्हाइट हाऊसमध्ये घडलेली एक गंभीर घटना उघडकीस आली आहे. व्हाइट हाऊसमध्ये एलॉन मस्क आणि अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांच्यात हाणामारी झाल्याची नवीन माहिती समोर आली आहे.

एलॉन मस्क यांनी 'रग्बी खेळाडूप्रमाणे' स्कॉट बेसेंट यांच्या बरगडीत खांद्याने धक्का दिल्याचे वृत्त द वॉशिंग्टन पोस्टने, डोनाल्ड ट्रम्प यांचे सहकारी स्टीव्ह बॅनन यांच्या हवाल्याने दिले आहे. एप्रिलच्या मध्यात मस्क आणि बेसेंट अंतर्गत महसूल सेवेच्या प्रमुखपदासाठी त्यांच्या पसंतीच्या उमेदवारासाठी लॉबिंग करण्यासाठी ओव्हल ऑफिसमध्ये एकत्र आले होते, तेव्हा ही घटना घडली होती. बॅनन यांनी 'द वॉशिंग्टन पोस्ट'ला सांगितले की, जेव्हा एलॉन मस्क आणि स्कॉट बेसेंट एका कॉरिडॉरमधून चालत जात होते, तेव्हा त्यांच्यातील वाद विकोपाला गेला आणि त्यांनी एकमेकांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्या वेळी स्कॉट बेसेंट यांनी एलॉन मस्क यांना थेट सुनावत, 'तू फ्रॉड आहेस', असे म्हटले. यावर एल. मस्क यांनी रग्बी खेळाडूसारखे त्यांच्या खांद्याने स्कॉट बेसेंट यांच्या बरगड्यांमध्ये धडक दिली. त्यानंतर स्कॉट बेसेंट यांनी देखील मस्क यांच्यावर प्रतिहल्ला केला, असे डोनाल्ड ट्रम्प यांचे सहकारी बॅनन म्हणाले.

पुढे मस्क आणि स्कॉट बेसेंट जेव्हा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या कार्यालयाजवळ पोहोचले, तेव्हा आवाज ऐकून अनेक कर्मचारी धावले आणि त्यांनी वाद सोडवण्याचा प्रयत्न केला. अखेरीस, मस्क यांना वेस्ट विंगमधून बाहेर काढण्यात आले.

## यवतमाळच्या पाचखेडमध्ये पुरातत्व संशोधकांची शोधमोहीम




**यवतमाळ :** जिल्ह्यास मुघल, निजामशाही, भोसले, गोंड साम्राज्याचा इतिहास आहे. मात्र नव्या संशोधनानुसार यवतमाळ जिल्ह्यात तीन हजार वर्षांपूर्वीचे लोहयुग, मध्य पाषाणयुग तसेच सातवाहन काळातील अवशेष आढळल्याने पुरातत्व संशोधकांनी जिल्ह्यातील ऐतिहासिक संदर्भ शोधण्याची मोहीम तीव्र केली आहे. इतिहासात डोकावयाचे असेल तर त्यास पुरातत्वीय संशोधनाची जोड द्यावीच लागते. जिल्ह्यातील बाभूळगाव तालुक्यातील पाचखेड हे गाव पुरातत्वीय संशोधनाने चर्चेत आले आहे. येथे तीन हजार वर्षांपूर्वीचे लोहयुगीन, मध्य पाषाणयुग तसेच सातवाहन काळातील अवशेष आढळले. इतिहास संशोधक डॉ. विलास वाहणे यांनी 2009 साली पाचखेड या गावाचा अहवाल सादर केला होता. त्यांच्या शोधकार्याने येथे वसलेली सांस्कृतिक धरोहर पहिल्यांदा उजागर झाली. दोन महिन्यांपासून नागपूर विद्यापीठातील प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्व विभागाचे प्रा. डॉ. प्रभास साहू तसेच डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांच्या नेतृत्वात संशोधकांच्या पथकाकडून येथे उत्खनन सुरु आहे.

## मत घोटाळ्याच्या राहुल गांधींच्या आरोपामुळे 'कामठी' पुन्हा ऐरणीवर



**नागपूर :** लोकसभेचे विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या कथित मतघोटाळ्याकडे लक्ष वेधताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कामठी मतदासंघात मतदारसंख्येत झालेल्या वाढीचे उदाहरण दिल्याने बावनकुळे संतप्त झाले आहेत. राहुल गांधी यांनी अभ्यासकरून बोलावे, नागपुरात येऊन बघावे, टीका त्यांनी शनिवारी नागपुरात केली. राहुल गांधी यांचा महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतदानावर आक्षेप घेणारा व आयोगाला काही प्रश्न विचारणारा लेख दैनिक लोकसत्तात प्रकाशित होताच त्याचे राजकी वर्तुळात तीव्र पडसाद उमटले. राज्याचे मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे दोघेही शनिवारी नागपुरात होते. त्यांनी राहुल गांधी यांच्या लेखावर प्रतिक्रिया दिल्या.

## निवृत्त आर्मी कर्नलची 18.8 लाखांची फसवणूक




**केरळ :** फॉरेक्स इन्व्हेस्टमेंटच्या नावाने एका निवृत्त आर्मी कर्नलची 18.90 लाखांना फसवणूक केल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या एका सिंडिकेटच्या एका सदस्याला अटक केली आहे, पोलिसांनी शनिवारी याबद्दल माहिती दिली आहे. पोलिसांनी सांगितले की आरोपी हा 29 वर्षीय श्रीजित राजेंद्रन हा एक केरळचा मच्छीमार आहे. त्याला अनेक महिन्यांच्या टेक्निकल सर्व्हेलन्स आणि तपासानंतर एका महिमेअंतर्गत कोल्लम जिल्ह्यातील अझीकल येथून अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात गेल्या वर्षी 31 ऑगस्ट रोजी भारतीय न्याय संहितेच्या कलम 420 आणि 34 अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला होता.

## खेळाडू पैशासाठी खेळतात, देशासाठी किंवा राज्यासाठी नाही



**बंगळुरू :** बंगळुरू येथे चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत 11 जणांचा मृत्यू झाल्यानंतर यावरून आरोप प्रत्यारोप होताना दिसत आहेत. यादरम्यान शनिवारी कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत यांच्याकडे राज्याचे मुख्यमंत्री सिद्धारामय्या यांच्याविरोधात कथित निष्काळजीपणा केल्याबद्दल एक औपचारिक तक्रार देण्यात आली आहे. 4 जून रोजी झालेल्या या चेंगराचेंगरीत 11 जणांचा मृत्यू आणि अनेक जण जखमी झाले आहेत, यानंतर भारतीय जनता पक्षाने देखील राज्यातील काँग्रेस सरकारविरोधात तीव्र भूमिका घेण्यास सुरूवात केली आहे. बंगळुरू येथील कोट्टीगेपाल्यमध्ये राहणाऱ्या गिरीश कुमार यांनी राज्यापालांना ही तक्रार दिली आहे. तसेच या तक्रारीमध्ये राज्य सरकारने घेतलेल्या आरसीबी सारख्या एका खाजगी क्रिकेट फ्रँचायझीसाठी भव्य स्वरुपात स्वागत समारंभ आयोजित करण्याच्या निर्णयावर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. यामध्ये दावा करण्यात आला आहे की देशाच्या अभिमानापेक्षा आयपीएल हे एक नफ्याच्या हेतूने चालवला जाणारे व्यावसायिक उपक्रम आहे. 'खेळाडू फ्रेंचायझीं विकत घेतात आणि ते पैशांसाठी खेळतात, देशासाठी किंवा राज्यासाठी नाही,' असा आरोप तक्रारकर्त्याने त्याच्या पत्रात केला आहे.

## राहुल गांधी यांच्या प्रश्नांना निवडणूक आयोग वस्तुनिष्ठ उत्तर का देत नाही : हर्षवर्धन सपकाळ




**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतांच्या चोरीच्या प्रश्नावर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लेख लिहून काही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत पण त्याची मिरची मात्र भाजपाला लागली. प्रश्न निवडणूक आयोगाला विचारले आहेत, त्याची उत्तरे त्यांनी देणे अपेक्षित असताना भाजपा नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेख लिहून उत्तरे दिली आहेत. फडणवीस यांचा लेख हास्यास्पद असून राहुल गांधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना मुद्देसुद उत्तरे देण्याऐवजी टीका करत जनतेला भ्रमित करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे, असे उत्तर महाराष्ट्रप्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहे. पत्रकार परिषदेत बोलतांना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या लेखाला प्रत्युत्तर दिले. देवेंद्र फडणवीस व भाजपा महायुती हीच मतांच्या चोरीचे लाभार्थी आहेत, ते आरोपी आहेत, सत्तेचा मलिदा लाटत आहेत आणि तेच उत्तरे देत आहात, तुम्ही रामशास्त्री प्रभूणेंच्या अविर्भावात वावरू नका, तुमचा कारभार तर घाशिराम कोतवालचा आहे. फडणवीस यांनी दिलेली उत्तरे ही थातूर मातूर आहेत, असा दावा सपकाळ यांनी केला. वेगळा विदर्भ झाल्याशिवाय लग्न करणार नाही. अजित पवार व राष्ट्रवादी बरोबर कधीच जाणार नाही, छगन भुजबळ यांच्यावर गंभीर आरोप केले, त्यांची जागा जेलमध्येच आहे हे सांगणारे, नारायण राणेंवरही भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करणारे हे तेच फडणवीस आहेत जे आज अजित पवार, नारायण राणे व भुजबळांना शेजारी घेऊन बसले आहेत. आता त्यांच्यासोबतच फिक्सिंग सुरु आहे. भ्रष्ट मंत्र्यांना क्लिन चिट देण्यात ते पटाईत आहेत. आता तर त्यांनी निवडणूक आयोगालाही क्लिन चिट देऊन टाकली, त्यामुळे संशय अधिक बळावला आहे. 'दाल में कुछ काल नही' तर सर्व दालच काळी आहे, अशी टीका हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

## फुकट्या प्रवाशांमुळे रेल्वेच्या तिजोरीत 11.19 कोटींचा महसूल जमा



**अकोला :** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात तब्बल 1.18 लाख प्रवाशांनी मे महिन्यामध्ये अनधिकृत प्रवास केला. त्या प्रवाशांवर कारवाईचा बडगा उगारत मध्य रेल्वेने 11.19 कोटींचा महसूल जमा केला आहे. फुकट्या प्रवाशांमुळे नियमित व अधिकृत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्रास सहन करावा लागतो. या विरोधात रेल्वेने कारवाईची मोहीम सुरू केली आहे. रेल्वे स्थानकांवर व गाड्यांमध्ये अनधिकृत प्रवेश व अनियमित प्रवास रोखण्यासाठी भुसावळ विभागात सातत्याने तिकीट तपासणी मोहीम राबवण्यात येते. प्रवाशांना आरामदायक प्रवास अनुभव मिळावा, यासाठी मेल, एक्स्प्रेस, सुट्टी विशेष व पॅसेंजर गाड्यांमध्ये व्यापक तिकीट तपासणी करण्यात येत आहे. विभागीय रेल्वे व्यवस्थापक इती पांडे यांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक अजय कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक (तिकिट तपासणी) पी.के. सिंह यांच्या देखरेखीखाली ही मोहीम राबविण्यात आली. मे 2025 मध्ये तिकीट तपासणी क्षेत्रात भुसावळ विभागाने उल्लेखनीय कार्य केले. विभागातील विविध गाड्यांमध्ये सातत्यपूर्ण तपासणी मोहीम राबवून विनातिकीट प्रवास, अनियमित तिकीट व प्रवास नियमांचे उल्लंघन यावर कठोर कारवाई करण्यात आली. या उपक्रमामुळे महसुलात मोठी वाढ झाली असून प्रवाशांमध्ये शिस्तबद्ध प्रवास संस्कृतीला चालना मिळाली आहे. मे महिन्यात एकूण एक लाख 18 हजार अनधिकृत प्रवास प्रकरणांवर कारवाई करत भुसावळ विभागाने तिकीट तपासणीद्वारे विक्रमी 11.19 कोटींचे महसूल मिळवला. यामध्ये अनियमित प्रवासाच्या 48 हजार 367 प्रकरणांतून 3.13 कोटी, विनातिकीट प्रवासाच्या 70 हजार 329 प्रकरणांतून 8.05 कोटी व विनाबुकिंग सामानाच्या 101 प्रकरणातून 23 रुपयांच्या दंड रक्कमेचा समावेश आहे.

## एमपीएससीची निवड यादी रखडली




**बुलढाणा :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससीमार्फत 2023 मध्ये घेतलेल्या लिपीक टंकलेखक परीक्षेची निवड यादी अद्याप जाहीर झालेली नाही. आयोगाकडून 'तारीख पे तारीख' देऊन परीक्षार्थींचा अपेक्षाभंग केला जात आहे. निकाल घोषित होऊन विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत आवाज उठवत राहू, अशी रोखठोक भूमिका शिवसेना (उबाठा) प्रवक्त्या जयश्री शेळके यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत 2023 मध्ये 7006 पदांसाठी महाराष्ट्र संयुक्त गट-क लिपिक-टंकलेखक पदाची परीक्षा घेण्यात आली होती. मात्र, दोन वर्षांपासून विद्यार्थी निवड यादीच्या प्रतिक्षेत आहेत. दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील उमेदवारांच्या एका शिष्टमंडळाने (विद्यार्थ्यांनी) बुलढाणा येथील संपर्क कार्यालयात भेटून जयश्री शेळके यांच्या समक्ष आपले गाऱ्हाने मांडले. तसेच त्यांच्या सोबत सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या भविष्यासमोर अनिश्चिततेचे मोठे सावट पसरलं असून शासनाच्या दुर्लक्षामुळे हजारो विद्यार्थी चिंतेत आहेत. आयोगाच्यावतीने याआधी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात अंतिम निकाल जाहीर करण्यासंदर्भात परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. मात्र आता जून महिन्याच्या अखेरपर्यंत अंतिम निकाल जाहीर करणार असल्याचे आयोगाने सांगितले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने तातडीने अंतिम निकाल जाहीर करावा, अशी सर्व पात्र विद्यार्थ्यांची मागणी आहे. युवकांच्या या संघर्षाला आमचा ठाम पाठिंबा असून विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत आवाज उठवत राहू असे जयश्री शेळके म्हणाल्या. निवड यादी लवकर जाहीर झाली नाही तर आंदोलन उभारण्याचा इशारा शेळके यांनी यावेळी बोलताना दिला.

मदतनिस पाहिजे
सुगतनगर, इंदोरा परिसरातील रहिवासी असणारा एक पदवीधर मदतनिस पाहिजे.
पगार ९०००/- रुपये महिना
संपर्क
मो. 7507661569

## राजू केंद्रे भारतीचा सत्यशोधक विवाह

**पारंपरिक लग्न पद्धतीला छेद देत...**




**नागपूर :** अंधश्रद्धा, जातिभेद आणि अवास्तव खर्च टाळणारी ही विवाहपद्धत, समाजसुधारणेच्या दिशेने उचललेले एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे. महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी या पद्धतीचा पाया घातला आणि स्त्री-पुरुष समानतेच्या मूल्यांना बळ दिले.

राजू केंद्रे हे महाराष्ट्रातील तरुण सामाजिक कार्यकर्ते आहेत. रविवारी राजू केंद्रे आणि भारती यांचा सत्यशोधक पद्धतीने विवाह पार पडला. समाजातील रूढी परंपरा चालीरीती यांना छेद देत त्यांनी हा विवाह केला. या सोहळ्याला महाराष्ट्राच्या विविध भागातून अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित झाले होते. हा आगळावेगळा विवाह सोहळा सर्वत्र चर्चेचा विषय ठरला आहे. सोबतच राजू आणि भरती यांनी सत्यशोधक विवाहाच्या माध्यमातून अनेकांसमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.

**राजु यांनी एसओएएस, युनिव्हर्सिटी ऑफ लंडन येथे ब्रिटिश सरकारच्या चेवनिंग स्कॉलरशिप वर एमएससी डेव्हलपमेंट स्टडीज पूर्ण केले. राजू केंद्रे स्वीडिश इन्स्टिट्यूट (स्वीडन) येथील फेलो सुद्धा आहेत. ग्लोबल गव्हर्नन्स मध्ये ग्लोबल अकॅडमी, बॉन (जर्मनी) कडून लीडरशिप फेलोशिप देखील देण्यात आली आहे. याशिवाय त्यांनी सावित्री जोतीराव समाजकार्य महाविद्यालय यवतमाळ येथे त्यांनी दोन वर्ष सहाय्यक प्राध्यापक म्हणून पण काम केले आहे, समाजकार्य विषयात ते नेट सेट आहे.**

राजू मूळचे बुलढाणा जिल्ह्यातील आहेत. ग्रामीण आदिवासी भागातील पहिल्या पिढीतील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळण्यासाठी ते काम करत आहेत. त्यांनी या कामासाठी 'एकलव्य' ही शैक्षणिक चळवळ सुरू केली आहे. फोर्ब्स इंडिया व हिंदुस्तान टाइम्सच्या सामाजिक श्रेत्र या विभागामध्ये भारतातील तिशीच्या आतील तीस 'प्रभावी तरुण व्यक्तिमत्त्वांच्या' यादीत त्यांचा समावेश केला आहे.

ग्रामीण आदिवासी भागातील पहिल्या पिढीतील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळण्यासाठी ते काम करत आहेत. त्यांनी या कामासाठी 'एकलव्य इंडिया' ही शैक्षणिक चळवळ सुरू केली आहे. एकलव्यच्या माध्यमातून त्यांनी आजवर 700 हून अधिक युवकांना उच्च शिक्षणासाठी संधी मिळवून दिली आहे. सोबतच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात 20000 हजार विद्यार्थ्यांपर्यंत एकलव्य उच्च शिक्षणाच्या संधी घेऊन गेले आहे. नुकतेच कारगिल मध्ये पण त्यांनी काम हाती घेतले आहे. जागतिक दर्जाच्या स्कॉलरशिपमध्ये वंचित घटकातील प्रतिनिधित्व कमी असल्याचे अनुभवल्याने त्यांनी लंडन मध्ये असताना ग्लोबल स्कॉलर्स प्रोग्रॅम सुरू केला आहे, त्या माध्यमातून ते शंभर पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांना वर्षभराची ट्रेनिंग देण्यात येते. पुढच्या एका दशकात किमान 2000 जागतिक ग्लोबल स्कॉलर्स घडवण्याचे त्यांचे ध्येय आहे.

### काय आहे सत्यशोधक विवाह?

सत्यशोधक विवाहातून कोणताही धार्मिक विधी, मंत्रपठण, ब्राह्मण वर्चस्व किंवा हुंडा नसतो. वधू-वर एकमेकांच्या समोर उभे राहून, प्रेम, सहजीवन, जबाबदारी आणि महात्मा जोतिराव फुले यांनी तयार केलेल्या समतेच्या मंगलाष्टक म्हणतात. हुंड्याला ठाम नकारसत्यशोधक समाजाची लग्न परंपरा हा हूंडाविरोधी चळवळीचा मजबूत भाग ठरली आहे. या विवाहात हुंडा घेणे किंवा देणे पूर्णतः निषिद्ध आहे. दोन्ही कुटुंबांतही याचे पालन होत असल्याने अनेक गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना आर्थिक दडपणाविना लग्न लावणे शक्य होते.

## वाचकांना आवाहन



दैनिक बहुजन सौरभची नागपूर शहरात सतत मागणी वाढत आहे. आपल्या घरी जो पेपर देतो. त्यांच्याकडे दैनिक बहुजन सौरभची मागणी करावी. आमच्या वर्तमानपत्राची स्वतंत्र अशी कोणतीही वितरण व्यवस्था नाही.

बहुजन सौरभ

दैनिक बहुजन सौरभ नागपूर शहरात सर्वच पेपर विक्री केंद्रावरती उपलब्ध आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

मुख्य संपादक
दैनिक बहुजन सौरभ

## संपादकीय

# प्रगल्भपणे निर्णय घेण्याची गरज

महाराष्ट्रात विचारधारा काम करते असे जरी म्हटले तरी एकेकाळी ज्या रिपब्लिकन पक्षाने आपले आमदार खासदार निवडून आणले होते. त्यांची आज स्वार्थापोटी काय गत झाली हे महाराष्ट्र बघतो आहे, हे लक्षात घेऊन येणाऱ्या काळात भाजप संघशक्तीला सामोरे जायचे असेल तर किमान हे भूमिका घेऊन काम करणारे दोन भाऊ या महाराष्ट्रात आपली शक्ती दाखवू शकतात. त्यांनी तरी किमान एकत्र यावे असा सध्या खल सुरू आहे तिकडे विचारधारेवर आंबेडकर परिवारातले चार भाऊ चार पक्ष घेऊन कामाला लागले आहेत. किती यश मिळते हे काळावर अवलंबून आहे. मात्र ठाकरे बंधूंचेच असे नाही, ते एकत्र आले तर भाजपाला नाकी नऊ आणू शकतात. उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची मनसेना यांच्या एकत्र येण्याच्या चर्चा सुरू आहेत. या विषयावर देश थांबला आहे किंवा गेला किंवा महाराष्ट्र थांबला आहे असे अजिबात नाही. या दोघांनी एकत्र यावे अशी इच्छा मात्र असंख्य जणांची आहे. तथापि, राजकारणात एकत्र येणे किंवा विभक्त होणे हे भावनेच्या आधारावर घेतले जाणारे निर्णय नसतात. तेथे सरळसरळ नफा-नुकसानीचा हिशेब असतो. तसे जर नसते तर विचारधारेत काडीचेही साम्य नसलेले पक्ष गेल्या पाच वर्षांत एकत्र आले नसते. त्याहीपुढे म्हणजे आपल्या पितृपक्षाशी फारकत घेऊन नवीन चूल मांडण्याची घाई काही नेत्यांनी केली नसती. त्यांना त्यांच्या लाभाचे गणित खुणावत होते व त्यानुसार नेत्यांनी निर्णय घेतले. राज्याच्या राजकारणात झालेल्या उलथापालथीचा सगळ्यांत लाभार्थी जर कोणी ठरला असेल तर तो भारतीय जनता पक्ष अन् सगळ्यांत जास्त तोटा जर कोणाचा झाला असेल तर ठाकरेंचा. या भूमिकेतून विचार करायचा झाल्यास ठाकरे बंधूंकडे एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही. फक्त पहिला फोन कोणी करायचा यातच त्यांनी वेळ घालवला तर महाराष्ट्राचे नंतर बघता येईल, त्यांचे नुकसान आणखीनच वाढत जाईल व कदाचित आता डागडुजीची मुळीच शक्यता नाही येथपर्यंत ते जाऊन पोहोचतील. राज्यातील फोडाफोडीत दोन्ही ठाकरेंच्या पक्षांना जवळपास शून्यावर यावे लागले आहे. राज ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या पक्षातील नेते न फोडता वेगळा पक्ष स्थापन केला आणि आपल्या प्रभावी वक्तृत्व शैलीद्वारे त्यांचे शिलेदार जमवले. पहिल्या सर्वच मग त्या स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा विधानसभा स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये त्यांना भरभरून मते मिळाली. दिल्लीच्या केजरीवालांनी पहिल्याच प्रयत्नात सरकार स्थापन केले तसे राज करू शकले नाहीत. त्याचे कारण दिल्ली वेगळी आणि महाराष्ट्र वेगळा. शिवाय केजरीवालांचे राजकारण वेगळे आणि राज यांची शैली वेगळी. ते मराठी आणि हिंदुत्वाच्या मुद्यांवर हेलकावे घेत राहिले. उद्धव ठाकरे यांच्याकडे पित्याने उभी केलेली एक जवळपास अर्धा शतकाचा इतिहास असलेली भरभक्कम संघटना होती. या संघटनेत कट्टर आणि निष्ठेची चाड असलेले नेते होते. बाळासाहेबांच्या हयातीत त्यांच्या शिवसेनेला हादरे बसले तथापि, रस्त्यात एखादा खड्डा आल्यावर थोडा धक्का बसावा एवढीच त्याची व्याप्ती होती. खरा हादरा बसला तो एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर. त्यांनी जवळपास 90 टक्के लोकप्रतिनिधी आपल्यासोबत नेले आणि उद्धव यांना मुख्यमंत्रीपद सोडावे लागले. तरीही पक्षसंघटना व विशेषतः शिवसैनिक त्यांच्यासोबत असल्यामुळे त्यांना फिकीर नव्हती व सरकार गमावल्याचा धक्का ते सहन करू शकले. आता ती स्थिती नाही. पक्षसंघटनेलाच गळती लागली आहे. मुंबईपासून नाशिक आणि विदर्भ आणि मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातूनही उद्धव सेनेतून आऊटगोईंग सुरू आहे. हे सगळे थोपवण्यात बाळासाहेबांकडे ज्या धडाडीचे नेते होते. तो उद्धवसेनेकडे सध्या नाही हे वास्तव आहे. हीच अवस्था राज यांच्या मनसेचीही आहे. स्थापनेपासून नाशिक महापालिकेचा अपवाद वगळला तर कुठलीही सत्ता नाही व ती येण्याची शक्यताही दिसत नसल्यामुळे नियमितपणे राज यांच्या सेनेतून आऊटगोईंग सुरूच आहे. पदाधिकाऱ्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या उड्या मारण्याला दोन्ही ठाकरेंनी आतापर्यंत फारशी धूप घातली नसली, तरी आता महाराष्ट्रातील स्थिती ती नाही जी दहा वर्षांपूर्वीपर्यंत होती. भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्र बऱ्यापैकी काबीज केला आहे. केंद्रात आणि राज्यातील सत्ता त्यांच्याकडे आहेच, मात्र, अनेक महापालिका आणि अन्य संस्थांवर त्यांनी पद्धतशीर जम बसवला आहे. शरद पवारांच्या आव्हानाचा सामना करत सहकार क्षेत्रातही शिरकाव केला आहे. राज्यातील विविध समाजांचा विचार करता प्रत्येक समाजात आपला एक चेहरा उभा करून त्यांना भक्कम पाठबळ देत नेता म्हणून प्रस्थापित करण्यातही भाजपला यश मिळाले. याची कल्पना भाजपला होती आणि आहे. पण ती खिळखिळी केली जाऊ शकते याची त्यांना खात्री होती आणि त्यांनी उपलब्ध सर्व पर्यायांचा वापर करून आपले ध्येय साध्य केले. बाळासाहेबांच्या हयातीत जी मंडळी तिसऱ्या किंवा चौथ्या रांगेत होती किंवा जे रांगेपर्यंतही पोहोचले नव्हते ते आज सत्तेत आहेत व आपल्या राजकीय जीवनाची ज्या पक्षातून सुरुवात केली त्या पक्षाच्या नेतृत्वाला आव्हान देत आहेत. अर्थात, राजकारणात उदय आणि अस्त असतो; पण भरारी घेण्याची व त्याकरता योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याचीही संधी मिळत असते. एका मुलाखतीत राज यांनी महाराष्ट्राकरीता एकत्र येण्याचे सूतोवाच केले व त्याला बहुदा पहिल्यांदाच उद्धव यांनी जाहीरपणे सकारात्मक प्रतिसाद दिला. आतापर्यंत घडलेली ही एकमेव सकारात्मक बाब. पूर्वी उद्धव यांनी काही बोलायच्या आत त्यांचे सरदारच मनसेनेला मोडीत काढून मोकळे. आतापर्यंत घडलेली ही एकमेव सकारात्मक बाब. पूर्वी उद्धव यांनी काही बोलायच्या आत त्यांचे सरदारच मनसेनेला मोडीत काढून मोकळे व्हायचे. आता आदित्य ठाकरे, संजय राऊत आणि अन्य मंडळीही सकारात्मक बोलत आहेत. एका ठिकाणी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र आंदोलनही केले. महाराष्ट्राचा एक स्वभाव आहे. कुटुंबात निर्माण झालेली कटुता फार काळ टिकत नाही व लोकांनाही ती आवडत नाही. दोन्ही भावांनी एकत्र येणे त्यांच्या स्वतःसाठी आणि मराठी माणसासाठी आवश्यक आहेच, पण त्याहीपेक्षा अधिक राज्यात एक समर्थ आणि सक्षम पर्याय असावा, किमान सरकारवर अंकुश ठेवू शकेल अशी शक्ती असावी म्हणूनही ते आवश्यक आहे. फोन कोणी करायचा यापेक्षा अधिक प्रगल्भपणे निर्णय घेण्याची सध्या गरज आहे. ■ ■

बहुजन सौरभ

# आतातरी सरकार, पोलीस यंत्रणा आणि न्यायव्यवस्था डोळस होतील काय...?

*घरात दम कोंडतोय; राज्यात रोज 32 वैष्णवींचा छळ, ग्रामीणपेक्षा शहरांमध्ये छळांच्या घटना अधिक या मथळ्याच्या आपल्या रिपोर्ट मध्ये सांगितले की, महाराष्ट्रात दररोज 32 महिलांचा पती आणि सासरच्या लोकांकडून छळ होत असल्याच्या तक्रारी पोलीसात दाखल होतात. दि. 1 जानेवारी 2022 ते 22 मे 2025 या 1237 दिवसात महाराष्ट्र राज्यात तब्बल 39 हजार 665 गुन्हे पोलिस दप्तरी नोंद झाले आहेत.*

चार भिंतीच्या आत विवाहितांचा दम कोंडत असल्यानेच त्या आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे अनेक घटनांवरून समोर आले आहे. काही विवाहिता सासरच्यांनी छळ केल्यानंतर पोलिसात तक्रार करतात. पण पोलीस त्याची दखल घेऊन प्रतिबंधात्मक कारवाई न करता प्रकरण भरोसा सेलकडे पाठवतात. त्या ठिकाणी स्त्रियांना वारंवार बोलावून समुपदेशन केले जाते. काही प्रकरणात समझोता होतो पण काही प्रकरणात सासरचे लोक सुनेला नांदविण्यास नकार देतात. तेव्हा मग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होतो. मुंबई पुण्यासारख्या शहरात कौटुंबिक हिंसाचार आणि हुंडाबळीची प्रकरणे मोठ्या प्रमाणात होत असल्याचे त्यांच्या अहवालात म्हटले आहे. याबाबत त्यांनी दिनांक 1 जानेवारी ते 22 मे 2025 या 4 महिने व 22 दिवसाच्या कालावधीतील आकडेवारी वरून स्पष्ट केले आहे. त्यांच्या अहवालानुसार बृहन्मुंबईत सर्वाधिक 412 तर अहिल्यानगर जिल्ह्यात 196, बीड 243, छत्रपती संभाजी नगर 288, धुळे 181, जालना 180, नागपूर 121, नांदेड 175, नाशिक 237, पुणे 229 इतके गुन्हे दाखल झाले आहेत. याशिवाय त्यांनी आपल्या अहवालात महिलांच्या छळाची महत्त्वाची कारणे सांगितली ती म्हणजे घर, प्लॉट, वाहन विकत घेण्यासाठी, व्यवसायासाठी आणि कर्ज फेडण्यासाठी होत असलेली पैशाची मागणी तसेच काही घटनांमध्ये लग्नाच्या वेळी हुंडा कमी दिला होता, तो आता घेऊन ये, असे म्हणत छळ होत असल्याचे दिसून आले. हा अहवाल वाचल्यानंतर सहजच समाजाच्या हिन मानसिकतेची चीड तर आलीच पण अशा प्रकरणात पोलिस, न्यायव्यवस्था आणि सरकारची असंवेदनशीलताही दिसून आली. कारण महिलांवरील अत्याचाराबाबत ह्या संस्था अजूनही फारशा गंभीर नसल्यामुळेच अशा घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

आपल्या देशात कायदेमंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका आणि माध्यमे ही लोकशाहीची चार स्तंभ आहेत. या चारही स्तंभांनी आपापले कामकाज योग्यप्रकारे केल्यासच लोकशाही मजबूत राहते. पण अलिकडील काळात या यंत्रणांना भ्रष्टाचाराने पोखरून टाकले असून त्यांच्यावर राजकीय दबावही वाढल्याचे दिसते. त्यामुळे लोकशाही, लोकांचे हक्क आणि समाजाची सुरक्षितता धोक्यात आली आहे. मात्र अजूनही काही सामाजिक कार्यकर्ते तसेच पोलिस यंत्रणा, पत्रकारिता आणि न्यायव्यवस्थेतील प्रामाणिक आणि आपल्या कर्तव्याशी इमान राखून कार्यरत असलेल्या मूठभर लोकांच्या कर्तव्य-दक्षतेमुळे लोकशाहीचा श्वास टिकून आहे. महाराष्ट्रात वैष्णवी हगवणे प्रकरणाने खळबळ माजली हे जरी खरे असले तरी दररोज अशा कितीतरी वैष्णवी कौटुंबिक अत्याचाराला बळी पडत आहेत. मात्र ह्या घटना दररोजच्याच झाल्या त्यामुळे 'रोज मरे त्यासाठी कोण रडे' या म्हणीप्रमाणे अशा घटनांच्या बाबतीत आवश्यक असलेली संवेदना ना समाजात, ना पोलिस यंत्रणेत, ना न्यायव्यवस्थेत निर्माण झाली. म्हणून वैष्णवी हगवणे प्रकरणामुळे तरी या यंत्रणांच्या हृदयाला पाझर फुटेल काय? समाज, सरकार, पोलिस यंत्रणा आणि न्यायव्यवस्था डोळस होतील काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे लोकशाहीचा चवथा स्तंभ असलेल्या काही मोजक्या मीडियाने, वर्तमान पत्रांनी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सोशल मीडियाने वैष्णवी हगवणे प्रकरण एवढे उचलून धरले की, राजकीय दबदबा असून देखील गुन्हेगारांना अटक करण्याशिवाय पोलिसांना पर्याय नव्हता. याबद्दल मिडिया, वर्तमान पत्रे आणि सोशल मीडियाच्या पत्रकारांचे खरोखर अभिनंदन. कारण पत्रकारिता हाच सामान्य आणि अन्यायग्रस्त माणसांचा आवाज आहे. पत्रकारच खऱ्या अर्थाने मूक समाजाचे मूकनायक आहेत. म्हणून आजच्या विकाऊ आणि भडवेगिरी करणाऱ्या पत्रकारितेत देखील सत्याची कास धरून काम करणारे प्रामाणिक पत्रकार सदैव आणि सातत्याने अन्यायाला वाचा फोडण्याचे काम करत राहतील ही अपेक्षा. अलीकडे काही सन्माननीय अपवाद वगळता राजकारण्यांनी गेंड्याची कातडी पांघरलेली आहे. त्यामुळे दुसऱ्यांची लेक तशी आपली लेक हा विचारही त्यांच्या डोक्यात येणे शक्य नाही. म्हणून ते अशा घटनांकडे कधी लक्ष देत नाहीत. विशेष म्हणजे अशा प्रकरणात राजकारणीच मोठ्या प्रमाणात गुन्हेगार आहेत.

प्रा. डॉ. एम.आर.इंगळे
मो. 9423429060

पोलीस यंत्रणेचा विचार केल्यास असे दिसते की, आपल्या कर्तव्याशी आणि 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीद वाक्याशी इमान राखून काम करणारे काही मोजके लोक सोडले तर बहुतांश लोक भ्रष्ट झाल्याचे दिसते. त्यामुळे ते कायद्याचा दुरुपयोग करून किंवा गुन्हेगारांना संरक्षण देऊन बक्कळ पैसा मिळविण्याच्या लालसेने किंवा राजकीय दबावाखाली काम करतात. परिणामी या यंत्रणेत माणुसकी, संवेदनशीलता आणि आपल्या कर्तव्याप्रती प्रामाणिकता




अभावानेच शिल्लक असल्याचे दिसते. सामान्य माणसांची भिस्त ज्या न्यायव्यवस्थेवर आहे त्या न्यायव्यस्थेची विश्वासार्हता देखील कमी होत चालली असून या व्यवस्थेलाही भ्रष्टाचाराची लागण झाल्याचे दिसते. त्यामुळे न्याय विकत घेण्याचे प्रमाण वाढले आहे. याशिवाय साक्ष, पुरावे, तपासणी, उलटतपासणी आणि तारीख पे तारीख अशा विविध कारणांनी केस वर्षानुवर्षे चालत राहिल्यामुळे पुरावे टिकून राहतील याची शाश्वती नसते. तर कधी साक्षीदार फितूर होतात, पुरावे गहाळ किंवा नष्ट केले जातात, वकिलांमध्ये सौदेबाजी चालते. त्यामुळे न्यायाच्या लांबलचक आणि क्लिष्ट प्रक्रियेच्या चक्रव्यूहात अन्यायग्रस्त स्त्रिया पिळल्या जातात. त्यामुळे न्यायाची अपेक्षा म्हणजे मृगजळ ठरते. म्हणून देशात खऱ्या अर्थाने कायद्याचे राज्य निर्माण व्हावे, सर्वांना सन्मानाचे, निर्भय व सुरक्षित जीवन जगता यावे आणि कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळीच्या घटनांना पायबंद बसावा यासाठी सर्व यंत्रणांनी आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणे काळाची गरजेचे आहे. ■ ■

# जननायक बिरसा मुंडा

इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. 1878 - 79 मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. 1884 साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसाऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले.

हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. 1885 साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. 1887 मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरिक्त 8 कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात 400 आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. 1890 मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असतांना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला.

**भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म 15 नोव्हेंबर 1875 रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली.**



श्याम ठाणेदार
मो. 9922546295

भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. 20 मे 1900 रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले. एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला.




न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र 9 जून 1900 रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली.

त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात.

नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंर्त्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन! ■ ■

# पँथर म्हणजे नुसता राडा नव्हे!

असे म्हणतात राडे करणाऱ्यांचा वरचा मजला रिकामा असतो. पण पँथर्स याला एकमात्र अपवाद होते आणि आहेत. भाई संगारे, मनोहर अंकुश, नामदेव ढसाळ, राजाभाऊ ढाले हे फक्त डॅशिंग नेते नव्हते तर ते वैचारिक डॅशिंग नेते होते. या साऱ्यांची भाषणे म्हणजे प्रत्येक पँथर्ससाठी एक वैचारिक डोस असायचा आणि या नेत्यांना आदर्श मानून प्रत्येक पँथर हा जरी डॅशिंग असला तरी त्याच्या प्रत्येक कृतीला एक वैचारिक धार होती आणि आहे. गौतम जाधवही त्यातलाच एक बुद्धिमान पँथर. महालक्ष्मी रेसकोर्स समोर जी म्युनिसिपल कामगार वसाहत आहे तेथे दोन पँथर्स रहायचे. एक जयवंत कांबळे आणि त्याच्या खांद्याला खांदा देऊन सोबत असायचा गौतम जाधव.

पँथरच्या प्रत्येक आंदोलनात ही जोडगोळी सर्वांच्या पुढे असायची. महानगर पालिका वसाहतीमधील प्रत्येक मुलांचे आईवडील हे सफाई कामगार असत. त्याच्यानंतर घर टिकवण्यासाठी ही मुलेही आपल्या पालकानंतर महापालिकेत सफाई कामगार म्हणून कामाला लागत. पण गौतम याला अपवाद होता. शिकलेला असल्याने त्याला म्युनिसिपल बँकेत लिपिकाची नोकरी मिळाली. मग हळू, हळू आपल्या स्वतःच्या हुषारीवर गौतम त्या बँकेचा मॅनेजर झाला. मॅनेजर झाल्यावर मात्र त्याने आमच्या उठावच्या पहिल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ माकडवाल्या सावकारांवर बँकेच्या परिसरात प्रवेश करण्यावर कायदेशीर बंदी आणली. त्यामुळे अनेक गुंड सोबत बाळगणारे माकडवाले सावकार गौतमवर डुख धरून होते. पण असल्या सावकारांना गौतमने अजिबात भिक घातली नाही. यातच त्याच डॅशिंग पँथरपण अधोरेखित झाले होते. जसे आमच्या चार चाळीला पूर्वी लोक 'म्हार चाळ' म्हणायचे तसेच गौतमच्या या वसाहतीला इतर लोक पूर्वी 'कचरपट्टी' किंवा 'भंगीवाडा' म्हणत. पण पँथर जन्माला आली आणि या वसाहतीला लोक 'गौतम नगर' म्हणू लागले. याचे एकमेव श्रेय पँथरला अर्थात पर्यायाने गौतम व जयवंत सारख्या हरेक पँथर्सना जाते. जसा जयवंत कांबळे कुणापुढे लाचार न होता मरेपर्यंत ताठ मानेने पँथर राहिला.

विवेक मोरे
मो. 8451932410

तसाच गौतम जाधवही 'भारतीय दलित पँथर' न बनता फक्त दलित पँथरचाच पँथर बनून राहिला. अशा या स्वाभिमानी पँथरची पुण्यानुमोदन व शोकसभा बुधवार दिनांक 26 फेब्रुवारी 2025 रोजी सकाळी 10 वाजता मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडे RTO ऑफिस जवळील ताडदेव येथील जनता केंद्रात आयोजित करण्यात आली आहे. या पँथरला निळा सॅल्युट द्यायला आपण सगळे येणारच आहात ही खात्री आहेच. जयभीम! ■ ■

## बहुजन मानस





नागेश चौधरी ( बहुजन विचारवंत )
9970873560

# पॅलेस्टाईन गाजा विरोधी इस्त्राएलची क्रूरता!

*गाजा आणि इजरायल मध्ये जो संघर्ष चालू आहे त्यात पॅलेस्टेन आणि गाजा मधील लोकांचा जो वंश विच्छेद चालू आहे ती जगातील एक अतिशय शरमेची गोष्ट आहे. तिथे इजराइल कडून आज पर्यंत सुमारे 60 हजार लोकांचे बळी गेलेले आहेत आणि या उलट ज्यू लोकांची मृत्यू संख्या काही हजारांत आहे. या हत्यां बाबत आणि हा एकतर्फी वंश नाश थांबावा म्हणून अजून गंभीर प्रयत्न होताना दिसत नाहीत.*

एका जमातीला नष्ट करण्याचा दुष्टपणा इजरायल अवलंबत आहे तो थांबणार कसा आणि तो थांबवण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न होताना दिसत नाहीत. मुस्लिम जगातील लोक देखील याला थांबवू शकले नाहीत. जागतिक मुस्लिम एकत्र येतात वगैरे हे सुद्धा यामुळे खोटे ठरलेले आहे. खरे म्हणजे पॅलेस्टाईनच्या भूमीवर जो सगळ्यात जास्त अधिकार आहे तो पॅलेस्टिनी लोकांचा अर्थात मुस्लिमांचा. सुरुवातीला त्या ठिकाणी मुस्लिम ख्रिश्चन आणि ज्यू काही प्रमाणात होते तोपर्यंत शांतता होती. परंतु हिटलरच्या ज्यू विरोधी भूमिकेनंतर युरोपातील ज्यू पॅलेस्टिन मध्ये यायला लागले आणि तिथल्या जमिनीवर कब्जा करायला लागले आणि संघर्षाला तिथून सुरुवात झाली. म्हणजे ज्याप्रमाणे आपल्या देशामध्ये इथे नसलेले आर्य बाहेरून आले आणि त्यांनी इथल्या भूमीवर कब्जा केला आणि इथल्या मूळ रहिवाशांना परागंदा केले, गुलाम केले किंवा त्यांना जंगलामध्ये जाण्यास बाध्य केले तशाच प्रकारची स्थिती काही प्रमाणामध्ये ज्यू लोकांनी पॅलेस्टीनी लोकांची केलेली आहे. ज्या ठिकाणी मुस्लिमांची सत्ता होती. मुस्लिमाच्या ताब्यात तो देश होता तिथे आक्रमण करून या लोकांनी आपली वस्ती केली आणि पॅलेस्टनी मुस्लिम लोकांची कत्तल करून त्यांना परागंदा केले, त्यांच्या हक्काच्या जागेपासून वंचित केले. म्हणून आजचा इजराइल हा परक्या आक्रमकांचा देश आहे. त्यांची मालकी नव्हती परंतु आज ते म्हणतात, आमचा हा देश आहे आणि मुसलमानांचा आम्ही वंशानाश करू आणि त्यासाठी हिंसक आक्रमकतेने वागत आहेत. जगभरातील यहुदी वा ज्यू लोक इस्त्रायलच्या त्या आक्रमक भूमिकेला मदत करत आहेत आणि विशेषतः अमेरिकेतील ज्यू.

अमेरिकेचे सध्याचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप देखील ज्यू लोकांना मदत करत आहेत. अगदी अलीकडील त्यांची काही स्टेटमेंट्स अशी आहेत की ते गाजाला मदत करत आहेत परंतु यात सत्यता किती किती हे नंतर दिसून येईल.

**हमास काय आहे आणि त्याचे लक्ष्य कोणते?**

हमासची सुरुवात 1987 मध्ये मुस्लिम ब्रदरहूडची एक शाखा म्हणून झाली. त्याचा अर्थ आहे इस्लामिक रेझिस्टन्स मूव्हमेंट. हमासचा इस्त्रायलने बळकावलेल्या भागाला विरोध आहे. त्याला इस्त्राएलने व्यापलेल्या वेस्ट बँक, पूर्व जेरुसलेम आणि गाझा ओलांडून इस्लामी व आपल्या हक्काचे राज्य हवे आहे.

**हमासचा इस्त्रायलवर हल्ला** – 7 ऑक्टोबर 2023 च्या हल्ल्यापूर्वी, हमासमध्ये सुमारे 30,000 सैनिक असल्याचा अंदाज होता. पॅलेस्टिनी निवडणुका जिंकल्यानंतर आणि प्रतिस्पर्ध्यांना बाहेर काढल्यानंतर 2007 पासून हमास गाझा पट्टीवर एकमेव शासक आहे. गाझातील संकट हे एका दीर्घ आणि वेदनादायक इतिहासाची निर्मिती आहे.

1948 मध्ये इस्त्रायल राज्याच्या निर्मितीपूर्वी, पॅलेस्टाईन प्रामुख्याने अरबांचे - मुस्लिम आणि ख्रिश्चन - घर होते आणि त्यांच्यामध्ये ज्यू अल्पसंख्यंक म्हणून राहत होते. आणि पॅलेस्टिनी पिढ्यानपिढ्या तेथे राहत होते, जमिनीची लागवड करत होते.




पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटिश राजवटीने अरब बहुसंख्य लोकांच्या संमतीशिवाय ज्यू लोकांसाठी 'वेगळा प्रदेश' देण्याचे आश्वासन दिले होते. नंतर युरोप मधील यहूदी ज्यांचा छळामुळे मोठ्या संख्येने येऊ लागले होते आणि त्यांनी पॅलेस्टिनी लोकांना बाजूला ढकलण्यास सुरवात केली. यूरोपीय लोकांनी जबाबदारी स्वतः घेण्याऐवजी, ती पॅलेस्टाईनवर लादली व पॅलेस्टिनी लोकांना विस्थापित करून यहुदींना जागा दिली. या मुळे ऐतिहासिक हिंसाचार आणि निराशेचा पाया रचला गेला.

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की इस्त्राएलच्या अर्थात, झिओनिझमच्या सुरुवातीच्या समर्थकांनी गाझाला 'इस्रायलच्या भूमीत' समाविष्ट केले नव्हते; ते 1948 मध्ये इजिप्तच्या ताब्यात आले, 1967 च्या युद्धानंतरच इस्त्रायलने आपला अधिकार गाजवला. लहान आकाराचे आणि पश्चिम किनाऱ्याशी थेट संबंध नसले तरी, गाझाने पॅलेस्टिनी ओळख आणि आकांक्षांच्या संघर्षात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. 1956-57 मध्ये इस्त्रायली ताब्याच्या वेळी येथे 1,280 लोकांचा मृत्यू झाला, ज्यात हत्याकांडांचा समावेश होता. 1956 मध्ये तत्कालीन इस्त्रायली लष्करी कमांडर मोशे दयान यांनी पॅलेस्टिनींचा संताप समजून घेतला जेव्हा ते म्हणाले... 'त्यांच्या डोळ्यांसमोर, आम्ही [इस्त्रायलींनी] त्यांच्या जमिनी आणि गावांना, जिथे ते आणि त्यांचे पूर्वज राहत होते, आमच्या ताब्यात घेतले आहे.' 1967 मध्ये, इस्त्रायलने पॅलेस्टाईन लोकांचा पाणीपुरवठा मर्यादित करून ते त्यांना तेथून निघून जाण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला. 1987 आणि 2000 मध्ये अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या इंतिफादा दरम्यान गाझावर इस्त्रायली हिंसाचाराचे तीव्र परिणाम होत राहिले. दुसऱ्या इंतिफादाच्या सुरुवातीला, गाझामध्ये 3,000 पॅलेस्टिनी मारले गेले, तर 350 हून अधिक लोक इस्त्रायली सशस्त्र दलांनी केलेल्या हत्येचे बळी ठरले.

1987 मध्ये गाझा येथे इस्लामी चळवळ हमासच्या उदयामुळे पॅलेस्टिनी प्रतिकार चळवळीत फूट पडली आणि वेस्ट बँकमध्ये वर्चस्व असलेल्या आणि रामल्लाहमध्ये पॅलेस्टिनी प्राधिकरणाचे नियंत्रण असलेल्या हमास आणि फताह यांच्यात संघर्ष निर्माण झाला. 2000-07 मध्ये, पॅलेस्टिनी गटांमधील अंतर्गत संघर्षात 350 हून अधिक पॅलेस्टिनी मारले गेले. सप्टेंबर 2005 मध्ये इस्त्रायलने गाझामधून माघार घेतल्यानंतर, हमासने गाझामध्ये निवडणूक जिंकली आणि फताहला बाहेर काढल्यानंतर, 2007 मध्ये पूर्ण नियंत्रण प्रस्थापित केले.

**एक तिहेरी गतिरोध** – इस्त्रायल पॅलेस्टिनींना केवळ सुरक्षा आव्हान म्हणून पाहत आहे यातून प्रश्न उद्भवतो. म्हणूनच, तो आपल्या सार्वभौम राज्यासाठी पॅलेस्टिनी लोकांवर प्राणघातक लष्करी बळाचा वापर करतो. 2008-09 मध्ये, हमासच्या क्षेपणास्त्र हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून, इस्त्रायलने 'ऑपरेशन कास्ट लीड' सुरू केले, ज्यामध्ये हवाई हल्ले आणि छापे यांचा समावेश होता ज्यामुळे 1,400 पॅलेस्टिनी आणि 13 इस्त्रायली मृत्युमुखी पडले.

हमासने ज्यासाठी हा संघर्ष उभारला तो त्याच्यावरच उलटला आहे. कारण इस्त्राएल अतिशय दुष्टपणाने वागत आहे. लहान मुलांना मुद्दामून लक्ष्य करत आहे. तिथल्या लोकांचे जगणे अशक्य करत आहे. मानवतेला लाज वाटावी अशी ही बाब आहे. जग 21 व्या शतकात आहे की संस्कृतीहीन पशु पातळीवर जगत आहे असे वाटते. पशू देखील दुसऱ्या पशुंचा सर्व नाव करत नाही आणि ज्यू यहुदी लोक ज्यांची बुद्धीमान म्हणून गणती होते ते इतके अमानवी का? त्यांना हा मानवतेचा हा क्रूरता पूर्ण नाश करताना त्यांना थोडीही मानवी संवेदना का नाही हा प्रश्न पडतो. भारतातही काही वंशवादी लोक इथल्या मूळ लोकांच्या बाबतीत आणि मुस्लिम, ख्रिश्चनांच्या बाबतीत अशीच अमानवी, अमानुष भूमिका घेत आहेत. ही वागणूक आजच्या आणि उद्याच्या मानवतेसाठी कलंक आहे. ही कलंकी वृत्ती नष्ट करणारी मानवता कशी आणि कधी उभी राहिल. ■ ■

# कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय क्रांती) : अभिशाप की वरदान

*भारतात दरवर्षी 11 मे हा ‘राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन’ म्हणून साजरा केला जातो. तंत्रज्ञानाचा एक भाग म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) अर्थात यंत्राद्वारे निर्माण किंवा नियंत्रित केलेल्या बुद्धिमत्तेला कृत्रिम बुद्धिमत्ता वा एआय म्हटले जाते. एआय ही संगणक (कंप्यूटर) विज्ञानातील एक शाखा आहे. जॉन मैकार्थीला एआय तंत्रज्ञानाचे जनक मानले जाते.*

एआय तंत्रज्ञान हे मानवी मनावर, व्यवहारावर मात करणारी, ‘खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे’ करणारी यंत्रणा असल्याचे जगाने मान्य केले आहे. आज जगभरात एआय ची चर्चा असून काहींनी या तंत्रज्ञानाला क्रांतीकारक म्हटले आहे, तर काहींनी विनाशकारी धोक्यामुळे चिंता व्यक्त केली आहे. ‘नेक्सस’ या ग्रंथाचे लेखक युवल नोआ हरारी म्हणतात, ‘हे तंत्रज्ञान मानवी नियंत्रणाच्या बाहेर गेले तर माणसालाच गुलाम करेल व माणसाचे अस्तित्व समाप्त करेल. या तंत्रज्ञानात मानवी नियंत्रणाबाहेर जाण्याची क्षमता आहे. जर मानव स्वतःला बुद्धिमान समजत असेल तर तो स्वतःच्या विनाशाला कारण ठरणारे तंत्रज्ञान विकसित का करत आहे?’ यावरून एआय चे धोके लक्षात घ्यावे लागतील.

आज जगात सर्वत्र बेरोजगार ही समस्या आहे. एआय मुळे भविष्यात जवळपास 70 टक्के नोकऱ्या नष्ट होणार आहेत. उदा. ड्रायव्हर, रिसेप्शनिस्ट, नर्स, मॉल मधील नोकर वर्ग ई. नोकरीपेशा वर्गाने नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेतले नाही किंवा पात्रता विकसित केली नाही तर त्याला नोकरीबाहेर पडावे लागणार आहे. एआय मुळे माणसाची व्यक्तीगत माहिती गोपनीय राहणार नाही. त्यामुळे व्यक्ती स्वातंत्र्याचा धोका निर्माण झाला आहे, हे लोकशाहीवरील संकट आहे. एआय रोबोट माणसासारखा विचार करणार असल्याचे आणि माणसाच्या मनाचा बुद्धिभेद करण्याचे तंत्रज्ञान विकसित करण्यात आल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे मानवाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एखाद्या व्यक्तीच्या मनात गोंधळ निर्माण करणे, त्याच्या विचारशक्तीवर अंकुश ठेवणे, त्याला योग्य अयोग्य निर्णय घेण्यापासून परावृत्त करणे किंवा त्याला निष्क्रिय करून चुकीच्या दिशेने नेण्याचे तंत्र एआय ने विकसित केले आहे. त्यामुळे अखिल मानव जातीचे भविष्य धोक्यात आले आहे.

एआयच्या कार्यशैलीप्रमाणे देशातील नागरिकांना नियंत्रित करणारी आणि बुद्धिभेदाची कार्यशाळा म्हणून भारतातील आरएसएसकडे पाहिले जाते. त्यामुळे आरएसएसवर अनेकदा बंदी लादण्यात आली होती. 2014 नंतर जनतेचा बुद्धिभेद करून आरएसएस प्रणीत भाजपा सत्तेत आली आहे. प्रत्येकाला 15 लाख रुपये, दरवर्षी दोन करोड नोकऱ्या, अच्छे दिन आणि अलीकडील ऑपरेशन सिंदूर ई. बुद्धिभेद करणाऱ्या घोषणा आहेत. सत्तेत सतत टिकून राहण्यासाठी ‘खोटे बोल पण रेटून बोल’ आणि साम, दाम, दंड, भेद या नीतीचा वापर करून प्रचारमंत्री आणि सरकारी यंत्रणा बुद्धिभेदाचे राजकारण करत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या देशाचे घटनाकार! संविधानाच्या माध्यमातून त्यांनी देशात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही वैश्विक मूल्ये रुजवली आहेत. संविधानामुळे भारतात विविध भाषा, प्रांत, जाती धर्मात विविधता असूनही भारत एकसंघ आहे. देशाचा राष्ट्रग्रंथ म्हणून भारताच्या संविधानाला जगात मान्यता आहे. या उलट भाजपा व संघी मानसिकता असणारे भक्त संविधानाचे विकृतीकरण करून मनूस्मृतीला सर्वश्रेष्ठ ग्रंथ मानत आहेत. देशात चातुर्वर्ण्य लागू करणारा आणि हिंदू राष्ट्राच्या संकल्पनेला खतपाणी घालणारा ग्रंथ म्हणजे मनूस्मृती होय. डॉ. बाबासाहेब म्हणतात, ‘हिंदू राष्ट्र अस्तित्वात आले तर ती या देशासाठी मोठी आपत्ती ठरेल. म्हणून या विषारी ग्रंथाचे डॉ. बाबासाहेबांनी 25 डिसेंबर 1927 रोजी दहन केले होते. अर्थात आरएसएस आणि डॉ. बाबासाहेबांची विचारधारा म्हणजे उत्तर दक्षिण ध्रुव होत.



श्रीराम बनसोड
मो. 8208617748

परंतु एआय चा वापर करून भाजपच्या आयटी सेलने एक व्हिडिओ वायरल केला आहे. या व्हीडिओ मध्ये रघुपती राघव राजाराम, पतीत पावन सीताराम असे गीत ऐकायला मिळते. संगीत सुरात नरेंद्र मोदी हे डॉ. बाबासाहेबांसोबत चालताना, त्यांच्याशी बोलताना दिसत आहेत. डॉ. बाबासाहेब केक कापत आहेत आणि नॉन बायोलॉजिकल प्रचारमंत्री टाळ्या वाजवत आहे. याशिवाय तडीपार गृहमंत्री अमित शाह, योगी आदित्यनाथ यांच्यासोबत डॉ. बाबासाहेब चालत आहेत. राहुल गांधी यांच्या हातात जाती जनगणनाचे पेपर्स आहेत. तर डॉ. बाबासाहेब राहुल गांधी यांच्याशी वाद घालतांना दिसत आहेत. सत्ताधाऱ्यांना अपेक्षित असा बुद्धिभेद करणारा व्हिडिओ बनविण्यात कल्पकता वापरली आहे. अशा प्रकारे एआय तंत्रज्ञानाचा वापर करून सामान्य नागरिकांचा बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न होत आहे. मोदी-योगी यांचे मोठेपण सिद्ध करण्याचा आणि डॉ. बाबासाहेबांचे अवमूल्यन करण्याचा निर्लज्ज प्रयत्न या व्हिडिओतून केला आहे. एआय च्या मदतीने या विषारी लोकांसोबत डॉ. बाबासाहेबांना दाखवण्याचा प्रयत्न पाहून कोणासही संताप आल्याशिवाय राहणार नाही. भविष्यात डॉ. बाबासाहेबांच्या तोंडून नरेंद्र मोदी, अमित शाह, योगीची स्तुती करणारे व्हिडिओ वायरल झाल तर नवल वाटणार नाही. वास्तविक असे बुद्धिभेद करणारे व्हिडिओ बनवणे हेच मुळात संविधान विरोधी कृत्य आहे. स्वतःच्या प्रसिद्धीसाठी आणि स्वतःचे मोठेपण मिरवण्यासाठी बनवलेल्या व्हिडिओतून सत्ताधाऱ्यांची विकृत मानसिकता आढळून येते. आमच्या डॉ. बाबासाहेबांचा अपमान करणारा आणि समस्त आंबेडकरी समाजाच्या भावना दुखावणारा व्हिडिओ आहे. महामानवाचे असे विडंबन करणाऱ्या व्यक्तीवर ॲट्रोसिटीचा गुन्हा लागू झाला पाहिजे. सदर व्हिडीओ बनविणाऱ्याला डॉ. बाबासाहेबांचे देशासाठी असलेले योगदान मात्र दिसले नाही. या व्हिडिओच्या निर्मात्याचा शोध घेऊन त्याला त्वरित अटक केली पाहिजे, तरच पुढचे अनर्थ टळू शकतील. घटनाकारांचे विकृतीकरण करणाऱ्यांवर न्यायालयाने ‘सुमोटो’ लावून कायदेशीर कार्यवाही केली पाहिजे.




या घटनेचा कितीही निषेध केला तरी तो कमीच आहे. एआय तंत्रज्ञान क्रांतीकारक घटना असली तरी संभाव्य धोके त्यापेक्षा जास्त आहेत, त्यामुळे एआय चा वापर मानवासाठी ‘अभिशाप की वरदान’ याचे उत्तर या प्रश्नातच दडले आहे! ■■

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

## आगलावे

विवाह म्हणजे साता जन्माची गाठ. दोन कुटुंबाचे जुळलेले स्नेहबंध. कोणत्याही मायबापाला आपल्या लेकीचा संसार हा सुखा-समाधानाचा असावा असेच वाटते. तर आपल्या सुनेमुळे सासरचे गोकुळ आनंदाने ऊजळून जावे ही भावना असते. पण कधीकधी या दोन कुटुंबातील मतभेदांमुळे गृहकलह निर्माण होतो. त्याला बरीच कारणे असतात. सुनेचे सासरच्या मंडळींशी न पटणे तसेच सुनेला योग्य वागणूक न मिळणे. कधी कधी दोन कुटुंबातील आर्थिक परिस्थिती वरून मानापमान नाट्य घडते. हुंडा, गैरसमज या गोष्टीही वादविवादाला तोंड फोडतात. कधीकधी मुलगा सासरच्या मंडळींच्या नको तेवढा आहारी जातो. अशी भावना त्याच्या कुटुंबात वाढीस लागते. कटूता निर्माण करणारी एक ना अनेक कारणे असू शकतात. यावर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर पुढे ही समस्या गंभीर रूप धारण करते. बरेचदा कुटुंबातील समजदार व्यक्ती या वादावर तोडगा काढतात. घरात ताणतणाव होऊ नये म्हणून वेळप्रसंगी मध्यस्थी करतात.पण काहीवेळा असे घडते की, मुलीच्या माहेरच्या मंडळींचा नको तेवढा हस्तक्षेप सासरी होऊ लागतो.कोणतीही गोष्ट समजून न घेता डोक्यात राख घालतात. त्यामुळे मनात प्रचंड चिड अन् राग ऊत्पन्न होते. राग हा तो वणवा आहे, एकदा का भडकला की बुद्धी अन् विचारांना भस्मसात करतो. आपल्याच लेकीचा संसार त्यामुळे बेचिराख होणार आहे याचेही भान त्यांना राहत नाही. एखादेवेळी कुणी तडजोड केली तरी मनात अढी कायम राहते. जेथे मनात अढी असते तेथे नात्यात गोडी नसते. जसे ऊसामध्ये जेथे गाठ असते तेथे रस नसतो. अन् जेथे रस असतो तेथे गाठ नसते. हीच गोष्ट संसारात लागू पडते.जेव्हा एखादी विवाहित मुलगी सासरी कसे वागावे? याचे प्रशिक्षण आपल्या माहेरातील कोचिंग क्लासमध्ये शिकते. तेव्हा तिला घटस्फोटाची पदवी हमखास मिळते. कधीकधी ती आपले नातेवाईक अन् कुटुंबाबाहेरच्या व्यक्तींच्या सल्ल्यानुसार वागते. पण तिला ही बाब कळत नाही की, तिच्या स्वतःच्या संसाराचे पतन त्या क्षणांपासून सुरू होते, जेव्हा ती आपल्याच कुटुंबाला पाडण्यासाठी ईतरांची मदत घेते. बाहेरच्या लोकांना काही घेणेदेणे नसते. अन् अविवेकी व्यक्तीला अक्कल नसते. हलक्या कानाची व्यक्ती इतरांच्या सल्ल्यानुसार वागते. याची परिणीती कोणत्या वळणावर जाईल याचा काही नेम नसतो. छोट्या छोट्या कुरबुरी वेळीच मिटवाव्या. तुटेपर्यंत ताणायचे नसते. वादविवादात शब्दांचा योग्य वापर होत नाही. शब्दाने शब्द वाढत जातो.

***शब्द, शब्द हर कोई कहे शब्द के हाथ ना पाव***
***शब्द ही दवा बनते हैऔर शब्द ही करें घाव।***

लक्षात ठेवा! जर समोरची व्यक्ती इरेला पेटली तर ती कोणत्या थराला जाईल याचा अंदाज बांधता येत नाही. झाडाच्या फांद्या कापल्याने झाड सुकत नाही. पण त्याच्या मुळावर घाव घालताच ते कोलमडून पडते. अविवेकी व्यक्ती ही मुळावर प्रहार करते. त्यामुळे कित्येक कुटुंबांची अक्षरशः वाताहात झाली आहे.ज्या व्यक्तींचा काहीही दोष नसतांना जेव्हा त्यांना अशा प्रकारच्या प्रसंगाना सामोरे जावे लागते तेव्हा ते हेच म्हणत असावे,

***‘कैसे करें भरोसा गैरों के प्यार पर?***
***जहा अपने ही मजे लेते है अपनों की हार पर।’***

जे लोक इतरांना चुकीचा मार्ग दाखवतात. भविष्यात जर त्यांना आपली चूक कळली अन् त्यांना पश्चाताप झाला तरी त्याचा काहीही फायदा नाही. जसे वादळाने कितीही क्षमायाचना केली तुटलेली फांदी कधीही जुळत नाही. या इतरांचे आयुष्य उध्वस्त करणाऱ्यांना हे सांगावे वाटते की, ‘तुफानों को कह दो आजमा कर दिखाए बहूत चिराग बूझाए है एक जलाकर दिखाए ।’ ■■

बहुजन सौरभ

# मी पाहिलेले भुटान शहर

***भुटान जगातले प्रथम क्रमांकाचे आनंदी राष्ट्र. भुटान हिमालयाच्या कुशीत बसलेला एक नितांत सुंदर देश. शुन्य प्रदुषण, देशभर कमालिची स्वच्छता, शांतता, सुरक्षितता आहे. हसतमुखपणा हा या देशातील सर्व लोकांचा स्वभाव आहे.***

जगातील सुमारे 222 देशांच्या आनंदी राष्ट्राच्या यादीत आणि कोविडच्या वेळी नो कोविड प्रथम क्रमांकावर होता. गरीब देश असला तरी इथला माणूस सुखी व आनंदी-प्रसन्न आहे. शिक्षण आणि आरोग्य सेवा मुक्त आहे. माझी नातीन तिला खूप उलट्या होऊ लागल्या तेव्हा आमच्या गाईडने दवाखान्यात नेले तर डॉक्टरांनी अगोदर हिस्ट्री मागीतली. आमच्याजवळ हिस्ट्री नसल्यामुळे तिला हाथच लावला नाही. Ors चा घोल घेऊन घ्या म्हटले. थिंपू हे राजधानी शहर. शहराच्या मुख्य रस्त्याच्या लगतच हॉटेल निटनेटके. गाड्यांचा हॉर्न ऐकू येते. संपूर्ण घाटीचा रस्ता जाणारा आपल्या साइडने येणारा आपल्या साइडने. स्वयंशिस्तीने लोक गाड्या चालवत असल्याने हॉर्न नाही, सिग्नल नाही, ट्रॅफिक जाम नाही. काही भागात हिंदी बोलतात, तर काही भागात निव्वळ इंग्लीश बोलतात.




माहायाना टेंपल जिथे तथागताची मूर्ती आहे. तिथे गेल्यावर असे कि आभाळ एकदम जवळच आहे. जमिनीपासून 2060 हजार उंचाईवर तथागताच्या मूर्तीची उंची 502 फूट आहे. भुटान ला 5 मे ते 5 जूनपर्यंत कार्यक्रम असतात. पूर्वी लामा देश चालवायचे. 1907 प्रथम राजा कुकेन वांग शू. पूनाखा, दो चूला हे दोन्ही शहराची जमिनीपासून 30360 उंचाईवर.

इथली (पूनाखा) रिवर/नदी पाहण्यालायक आहे. नालंदा युनिवर्सिटी तिथे आर्याजी शिक्षण घेतात. घराचे नक्षीकाम, टेंपलचे नक्षीकाम प्रत्येक घर हॉटेल, टेंपल हे सगळे मनाला मोहुन टाकते. आयरन ब्रिज, निसर्ग हिरवागार, सीनरा नदी, जल प्रपात, झरने मंत्र मुग्ध करतात. आम्ही तिथल्या लोकगीत आणि त्यांच्यासोबत लोकगीतावर डांस केला. हॉटेलातील कष्टाची काम मुलीही तत्परतेने करतात. टुरिझम आणि शेती मुख्य व्यवसाय. चोरी नाही, शिल जपा, गरजा कमी, सुख जास्त.

शारदा पाटील मोटघरे
मो. 8010763645

भारतीय करंसी चालते. भारतीयांबद्दल विशेष आस्था आहे. कारण बुद्धाचा देश भारत. माणसाला सर्वात जास्त काळजी असते, मुला मुलींचे शिक्षण कसे होणार-आपल्या म्हातारपणी आरोग्याचे काय होणार आणि कमवलेला पैसा चोरीला गेल्यास आपले कसे होणार. हे दोन प्रश्न सुटले कि माणूस आनंदी होऊ शकतो. हेच भुटानला आहे.

मी गाईडला म्हटले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरबद्दल काही सांग तेव्हा त्याने मला- ‘हु इज डॉ. बाबासाहेब. मी तुला सांगते बुद्ध धम्म अस्त हो रहा था, डॉ. बाबासाहेब ने पूर्नजिवीत केला, भारत देश का संविधान तयार करून पेश केला ते बाबासाहेब आंबेडकर.’

भुटानला जायच असेल तर मार्च, एप्रिल महिना फार छान असते. ■■

# भोंदू बाबा कसे लोंकाना मुर्ख बनवतात

आपण सर्व लोक विवेकशील आहोत. परंतु आपल्या समाजात जर ढोबळ मानाने अभ्यास केला तर जगात सुमारे 25 टक्के लोक बुद्धिमान असतात. त्यामध्ये 50 टक्के लोकांचा बुद्ध्यांक सरासरी असतो, आणि 25 टक्के लोकांचा बुद्ध्यांक सरासरीपेक्षा कमी असतो व 25 टक्के चा सरासरीपेक्षा जास्त असतो. जेव्हा केव्हा बुद्धिमत्तेचा अभ्यास केला जातो, हे वरील सूत्र जगात कुठेही लागू होते. आपल्या समाजात 25टक्के लोक बुद्धिमान असतात आणि 25 टक्के लोक गाढव असतात, भोंदू असतात. 50 टक्के लोक येथे थोडेसे घसरले तर ते भोंदू बनतात. जर ते तिथे थोडे वर चढले तर ते बुद्धिमान होतात. म्हणूनच निवडणुकीच्या वेळी नेते तुम्हाला बौद्धिक आश्वासने देत नाहीत. ते भावनिक आश्वासने देतात कारण भावनांच्या वादळात सरासरी बुद्धिमान व्यक्ती मूर्ख बनणे खूप सोपे असते. यासाठी आपण भावनिक बनतो, समजदार नाही. याचा अर्थ असा की कोणत्याही देशात 75 टक्के लोक सरासरी किंवा सरासरीपेक्षा कमी आहेत. जे खूप हुशार आहेत त्यांची संख्या फक्त 25 टक्के आहे. त्यातही फरक आहे. जे खूप हुशार आहेत ते 1 टक्के असू शकतात, नंतर थोडे कमी, थोडे कमी, थोडे कमी होत जातात. जेव्हा मूल्यांचे प्रतिमेत रूपांतर केले जाते, तेव्हा समाजातील सामान्य भोंदू लोकांना फार खोल गोष्टी समजत नाहीत, त्यांना खोलात जायचे नसते, त्यांना प्रत्येक प्रश्नाची ढोबळ उत्तरे हवी असतात. एक माणूस दिवसभर रिक्षा चालवून संध्याकाळी घरी येतो. आता जर कोणी त्याला म्हटले की, चला तात्विक चर्चा करूया, तर तो म्हणतो, ‘मित्रा, माझे तत्वज्ञान सकाळपासून संध्याकाळपर्यंत रिक्षावर चालते, तू त्यावर चर्चा करू शकतोस, मी असाच ठीक आहे.’

‘हे जग कोणी निर्माण केले?’

तो म्हणतो ‘मला माहित नाही’,

मी म्हणालो, ‘मला माहित नाही, ते कोणी तयार केले ते तरी सांग’. त्याला शंकराचार्य नको असतो, बोलण्यासाठी त्याला आवश्यकता असते बाबांची, यासाठी त्याला अशा बाबांची गरज असते जो सरळ गोड गोड उत्तरे देईल आणि त्याच्या मनाला त्रास देणार नाही आणि त्याने बाबाला जर विचारले, ‘बाबा, मी आठवडाभर खूप कष्ट करतो पण फायदा होत नाही, गरिबी जात नाही, मी काय करू?’

बाबांची दाढी खूप लांब असते; वेगळाच पेहराव असतो, प्रत्येक धर्माचे बाबाच्या डोक्यावर काहीतरी पागोटे बांधले असते; त्याचे कपडे सामान्य माणसापेक्षा वेगळे असतात त्याने शक्यतो मोठा झगा घातला असतो. जेणेकरून बाबा असल्याचा विश्वास अधिक दृढ होतो, खोलवर जातो; बाबा कधी टी शर्ट, जीन्स घालून का बोलू शकत नाहीत कारण जर बाबा जीन्स घालत असतील, टी-शर्ट घालत असतील आणि मुंडण केले नसेल तर लोक त्यांना बाबा मानणार नाहीत; तोही बाबासारखा दिसला पाहिजे. गणवेशही खूप महत्त्वाचा असतो, सरकारी अधिकारी गणवेश का घालतात? कारण ते इतर लोकांपासून वेगळे दिसतात. गणवेश महत्त्वाचा असतो, बाबाच्या पेहरावावरुन तो एक ज्ञानी माणूस आहे असे वाटते, तसे होण्यासाठी 25-30 दिवसांची सेवा आवश्यक नसते. एखाद्याला काहीतरी करावे लागते आणि तो ज्ञानी होऊ शकतो. आयपीएस होणे पुरुष आणि महिलांसाठी कठीण असते, त्यासाठी त्यांना भरपूर अभ्यास करावा लागतो काहीतरी वेगळे करावे लागते, दुसरा मार्ग, तीसरा मार्ग शोधावा लागतो, तो फार कठीण असतो. बाबांचा मार्ग सोपा आहे, जर काही त्रास झाला तर काही अडचण नाही, त्यानंतर त्यांच्याशी ज्ञानाबद्दल बोलताना तो रिक्षावाला म्हणतो, ‘बाबा, मी माझा संदेश देवापर्यंत कसा पोहोचवू?’, बाबांलाही तो कसा पोहोचवायचा हे माहित नसते, पण त्यांला माहित असते की आलेल्या प्रत्येक माणसाचा त्याच्यावर विश्वास आहे की बाबाला देवापर्यंत कसा संदेश पोहचवायचा आहे हे माहित आहे. तसे दोघांनाही काहीच माहित नसते.



डॉ. सुनिल भगत
मो. 94230 64391

मग बाबा म्हणतात, ‘काळजी करू नको, तुमच्या घरी खोलीत भिंतीवर एक चित्र लटकले आहे, त्या चित्रामागे एक सरडा आहे, तो हाकलून लाव, देव तुला पावेल, आशीर्वाद देईल, तुझे भले होईल’.

मग दुसरा भक्त येतो, तो आपले दुःख व्यक्त करतो, बाबा म्हणतो, ‘तु समोसा खातो का?’, ‘तु कोणती चटणी खातो’? भक्त म्हणतो, ‘मी लाल चटणी खातो’, बाबा म्हणतो ‘नाही, म्हणून तर तुझ्यावर देवाची कृपा थांबली आहे, तुला हिरवी चटणी खावी लागेल, आणि जर तु हिरवी चटणी खाल्ली तर देवाची तुझ्यावर नक्कीच कृपा होईल’ वरील संवाद आपण कुठे न कुठे नक्कीच ऐकला असेल किंवा पाहला असेल यांच्याच आधारावर हे सांगत आहे, बरे, बाबाचे हे बोलणे ऐकून समोरचा भक्त, आपल्याला वाटते की बाबाला चप्पल काढून का मारत नाही आहे, तो का रागावत नाही आहे, की जर त्याच्या आध्यात्मिक समस्येचा उपाय समोसा चटणीच्या रंगात असेल तर त्याला राग यायला पाहिजे, पण होते काय की तो त्या बाबाचे पाय धरतो, म्हणतो ‘बाबा, आपण किती ज्ञानी आहात, आपण माझे दुःख जाणले, माझ्या डोळ्यातून अश्रू येत आहेत’ आणि भक्त आपला खिसा हलका करून मूर्ख बनून बाहेर पडतो. यात येणाऱ्या 10 टक्के लोंकाना कर्मधर्मसंयोगाने एखादाला फायदा होऊ शकतो, पण बाकीचे आर्थिक दृष्ट्या लुबाडले जातात. आता आपण विचार करा की, आपल्या समाजात इतके सारे निर्बुद्ध लोक आहेत, गाढव लोक आहेत की त्याना कोणीही सहजासहजी मूर्ख बनवू शकते. एका राजकीय विचारवंताने विनोद केला की लोकशाही म्हणजे काय, हा 51 टक्के चा नियम आहे, शासन आहे, जर कोणत्याही समाजात 100 पैकी 51 गाढवे असतील तर त्या समाजाचे राष्ट्रगीत ‘ढेचू ढेचू’ असेल, ही एक साधी गोष्ट आहे, कोणीही कितीही परिस्थिती सुधारवण्याचा प्रयत्न केला तरी काहीही साध्य होणार नाही, जेव्हा 51 गाढवे आहेत आणि 51 गाढवे एकसंघ आहेत, जास्तच एकता आहे. बुद्धिमान लोकांमध्ये एकता नसते प्रत्येकजण वेगळा विचारच करत असतो, मूर्खांमध्ये खूप एकता असते, आता 49 हंस जे काही करतील ते फक्त 51 गाढवाद्वारे एकमताने ठरवले जाईल जर संविधान सभा हंस आणि गाढवांमध्ये बसली, तर गाढवांनी बहुमताने निर्णय घेतला की राष्ट्राने नाचावे, नाचावे, हंस म्हणत होते की काहीतरी चांगले विचार करा मित्रा, ते म्हणतील की नाही, 51 चा निर्णय आपला असेल आणि त्यानंतर देश जसा आहे तसाच चालू राहतो, म्हणून नियम बनवले गेले कारण ती मूल्ये नियमांद्वारे व्यक्त केली जात होती, मूल्ये समजली गेली, खूप कमी लोक प्रभावित झाले, नवीन पिढीचे नियम पुढील पिढीत चालू आहेत, ते पुढील पिढीत चालू आहेत, ते मूल्ये काय होती हे विसरले आहेत, ते त्यामागे नियम वाहून नेत आहेत.




ज्या परिस्थितींना तोंड द्यावे लागत आहे. यामुळे एक विशिष्ट मूल्य निर्माण झाले, ती परिस्थिती बदलली, उलट परिस्थिती उलट झाली. या नवीन परिस्थितीत हे मॉडेल अजिबात काम करत नाहीये, पण मूर्ख लोक ते मॉडेल देवाचा आदेश समजून पाळत आहेत. त्यांना हे समजत नाही की मॉडेलमागे काहीतरी मूल्य असावे, जे बदलले असावे.

तुम्ही इराण, इराक, सौदी अरेबिया सारख्या देशात राहत असाल तर, तीथे धुळीचे वादळ येते वावटळ येते, त्या धुळीमुळे चेहरा खराब होतो, त्वचा खराब होते, म्हणून असा नियम करण्यात आला की प्रत्येकाने चेहरा झाकणारे कपडे घालावेत, जेणेकरून आरोग्यावर परिणाम होणार नाही, आणि अनेक समस्यांना तोंड द्यावे लागणार नाही. तुम्हाला आश्चर्य वाटत असेल की राजस्थानमध्ये, जिथे धुळीची वादळे असतात, तिथेही पडद्याची प्रथा काहीशी अशीच आहे, इथेही पगडी घातली जाते, आणि पगडी म्हणजे काय? साफा किंवा पागोटे असते. हे असे कापड असते की अचानक वादळ आले तर तुम्ही ते तुमच्या चेहऱ्यावर किंवा शरीरावर साफा झाकून घेऊ शकता. पण आता ही प्रथा सर्व ठिकाणी आवश्यक नसते, पण प्रत्येक ठिकाणी स्त्रियांना पदर, घुंगट, माणसाला पागोटे, साफा, बुरखा घालणे बंधनकारक केले जाते. त्यांना हे समजत नाही की ह्या प्रथेमागे काहीतरी स्थानिक मूल्य असते, ते बाकी ठिकाणी अनावश्यक असते. परंतु तो एक दैवी आदेश समजून अंध पणे पाळला जातो. जे बदलले जायला पाहिजे. ■■

# अनुसूचीत जातीच्या विकासासाठी प्रभावी माध्यम

अनुसूचित जाती, दलित यांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी हे प्रभावी माध्यम आहे. त्यासाठी योजनेचे वास्तविक व प्रभावी क्रियान्वयन होणे गरजेचे आहे. राजनीतिक, सामाजिक संगठन/कार्यकर्ते, एनजीओ यांनी या योजनेकडे बारकाईने लक्ष्य देण्याची व योजना 100टक्के वास्तविक स्वरूपात राज्य, जिल्हा पातळीवर राबवून घेण्याची आवश्यकता आहे. योजना राबवितांना लोकसंख्येचे प्रमाणावर लक्ष केंद्रित करणे जरूरी आहे. अनुसूचित जाती मधे 70टक्के जनसंख्या ही बौद्धांची आहे. समग्र सामाजिक उन्नती उद्देश ठेवून आंबेडकरी संगठन, विहारें, सामाजिक कार्यकर्ते यांनी या योजनेच्या सफलतेसाठी सक्रीय लक्ष्य पुरविणे गरजेचे आहे. अनुसूचित जाती विशेष घटक योजनेचे क्रियान्वयन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागद्वारे राज्य व जिल्हा स्तरावर केले जाते. राज्य स्तरीय योजना व जिल्हा स्तरीय योजनेमधे वेगवेगळी तरतूद व अंमलबजावणी/खर्च केला जातो. योजनेचे प्रमुख घटक कृषी, ग्रामीण विकास, सामाजिक समुदाय सेवा आहेत. ऊर्जा, उद्योग/खनिज, वाहतुक/दळणवळण, सामान्य सेवा, ईतर कार्यक्रम या घटकावर सुद्धा तरतूद व खर्च केला जातो. प्रस्तुत तक्त्यात गेल्या 6 वर्षाचे आंकडे (राज्य व जिल्हा स्तरीय जोडून/समेकित करून) दिले आहेत. या अवधीमधे सर्वच प्रमुख राजकीय पक्षाचे (भाजपा, कॉंग्रेस, दोन्ही शिवसेना, राष्ट्रवादी) सरकार सत्तेत राहले/सहभागी होते. निरीक्षण केल्यावर लक्षात येते की -

***अनुसूचित जातीच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकासासाठी महाराष्ट्र सरकारद्वारा राबविल्या जाणारी ही महत्वपूर्ण योजना आहे. योजनेचे क्रियान्वयन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागद्वारे राज्य व जिल्हा स्तरावर केले जाते.***

1. तरतुद आणि प्रत्यक्ष खर्च या मधे तफावत 33 टक्के दिसून येते. तरतूदी एवढा प्रत्यक्ष खर्च केल्या जात नाही. अनुसूचित जातीच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी राखीव केलेला निधी अन्यत्र वळविला जातो. कदाचित ‘लाडकी बहिन योजना’ सारख्या ‘लोकप्रिय’ योजनेकडेपण वळविला असेल.

2. वर्ष 2022-23 च्या आंकड्याचे अध्ययन केल्यास लक्षात येते की एकूण तरतूद? 12229 कोटी होती. परंतु फेब्रुवारी 2023 पर्यंत प्रत्यक्ष खर्च, 4580 कोटी म्हणजे फक्त 37टक्के केला. आर्थिक वर्ष 2022-23 च्या 11 महिन्यात खर्च हा 37टक्के होता, जवळपास अशीच परिस्थिती दरवर्षी असते. म्हणजे शेवटच्या मार्च महिन्यात अधिकांश खर्च घाईघाईने केला जातो किंवा आंकड्याची फुगवाफुगवी केली जाते. विकास ही निरंतर व नियमीत प्रक्रिया आहे, लक्ष्य ध्यानात ठेवून खर्च हा दर महिन्याला निरंतर करणे आवश्यक आहे. अंतिम समयी अधिकांश खर्च करणे किंवा दाखविणे यामुळे वास्तविक विकास होत नाही.



अनुसूचीत जाती विशेष घटक योजना (निधी वाटप/तरतुद व प्रत्यक्ष खर्च)
राज्य स्तरीय योजना + जिल्हा स्तरीय योजना (आंकडे कोटी रु मधे)

| वर्ष | 2023-24 | | 2022-23 (फेब्रुवारी पर्यंत) | | 2021-22 | | 2020-21 | | 2019-20 | | 2018-19 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| - | तरतुद | खर्च | तरतुद | खर्च | तरतुद | खर्च | तरतुद | खर्च | तरतुद | खर्च | तरतुद | खर्च |
| एकूण:- | 13820 | 10997 | 12229 | 4580 | 10634 | 8828 | 9667 | 6461 | 9208 | 6388 | 9949 | 6468 |
| मुख्य: 1. कृषी व संलग्न व्यवसाय | 454 | 377 | 600 | 186 | 534 | 410 | 509 | 399 | 573 | 420 | 1644 | 477 |
| 2. ग्रामीण विकास | 604 | 429 | 401 | 303 | 193 | 98 | 203 | 318 | 112 | 72 | 242 | 47 |
| 3. सामाजिक व समुदाय सेवा | 11721 | 9547 | 10108 | 3756 | 9256 | 7756 | 8407 | 5283 | 7681 | 5388 | 7577 | 5254 |
| 4. ऊर्जा | 247 | 250 | 253 | 149 | 224 | 156 | 222 | 164 | 134 | 146 | 135 | 114 |
| 5. उद्योग व खनीज | 225 | 94 | 245 | 43 | 75 | 54 | 53 | 21 | 70 | 26 | 71 | 59 |
| 6. वाहतुक व दळणवळण | 52 | 53 | 79 | 11 | 76 | 77 | 71 | 67 | 318 | 181 | 70 | 47 |

स्त्रोत : इकॉनॉमीक सर्वे ऑफ महाराष्ट्र शासन, सामाजिक विशेष सहाय्य विभाग अहवाल

बहुजन सौरभ

3. वर्ष 2018-19 ते 2023-24 या 6 वर्षात तरतूद व खर्च खालीलप्रमाणे होता. (आँकडे कोटी मधे)

**तरतुद खर्च टक्के :-**

एकूण 65507 43722 67 टक्के, सामाजिक सेवा 54750 36984 67 टक्के, कृषी 4344 2269 52 टक्के, ग्रामीण विकास 1755 1267 72 टक्के अनुसूचित जाती विशेष घटक योजनेत 6 वर्षात एकूण तरतूद रू. 65507 कोटी होती, परंतु खर्च रू. 43722 कोटी झाला. 33टक्के निधी रू. 21785 कोटी अखर्चीत राहिला व अन्य योजनामधे वळविला गेला ही अत्यंत गंभीर बाब आहे. या योजने अंतर्गत राखीव/तरतूद केलेला निधी विशेष करून अखर्चीत निधी अनुसूचित जातीच्या शैक्षणिक, आरोग्य, रोजगार, व्यावसायिक/कौशल्य प्रशिक्षण, वस्तिगृह निर्माण, उच्च शिक्षण छात्रवृत्ती, कृषी विकास, गृह निर्माण, ऋण/अनुदान, स्वच्छता सुविधा इत्यादी गरजा पूर्ण करण्यासाठी वापर केला पाहिजे. योजनेच्या क्रियान्वयन मधे पारदर्शीता व जवाबदारी निश्चितता पाहिजे. महत्वपूर्ण म्हणजे खर्च हा लोकसंख्येच्या प्रमाणात व्हायला पाहीजे. योजनेच्या प्रभावी क्रियान्वयनसाठी राजनीतिक, सामाजिक संगठन, कार्यकर्ते एनजीओ यांनी निरंतर लक्ष पुरविणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवर कलेक्टर कार्यालय, जिल्हा परिषद, सामाजिक न्याय विभाग, बीडीओ/ तहसील/ कृषी/ग्रामीण विकास कार्यालय यांच्याशी निरंतर सम्पर्क, समन्वय पाहिजे. सत्ताधारी/विरोधी पार्टी, आमदार, खासदार, मंत्री यांच्याशी पण निरंतर सम्पर्क, समन्वय पाहिजे. ‘माहितीचा अधिकार नियम’ याचा वेळप्रसंगी प्रभावी उपयोग करायला पाहिजे. विशेष म्हणजे जनतेमधे आपल्या अधिकाराविषयी जागृती निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. ■■



लक्ष्मण बोरकर
मो. 7709318607

# महाराष्ट्रातील बौद्ध धम्माची चळवळ

परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानव मुक्तीची चळवळ आरंभ केली. गुलाम मानसिकता असलेल्या जनमाणसात स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित करून गुलामी विरूद्ध संघर्ष करण्याची मानसिकता तयार केली. समाज खळबळून जागा झाला. सामाजिक शोषणाच्या विरूद्ध लढण्यास तयार झाला. अंधाऱ्या युगातून उजेडाकडे प्रवास करू लागला. स्वाभिमानाची कास धरून गुलामी नाकारू लागले. संघर्ष सुरू झाले. पारंपारिक मानसिकतेचे लोक विरोध करू लागले. सामाजिक न्याय समतेचे लढे सुरु होऊन समतावादी शोषणमुक्त समाज व्यवस्थेकडे वाटचाल सुरू झाली.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात महाड चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा सत्याग्रह. नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह पार्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह करून समाज व्यवस्थेला जागविण्याचा प्रयत्न केला. परंतु व्यवस्था हलण्याचे नाव घेत नव्हती. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना येवला येथील जाहिर सभेत 1935 ला जाहिर करावे लागले की, ‘मी हिन्दु धर्मात जन्मलो हे माझ्या हातात नव्हते. परंतु मी हिंदू म्हणून मरणार नाही.’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व धर्मांचा सखोल अभ्यास करून सामाजिक समतेचे मूल्य साकार करणारा बुद्ध यांचा धम्म स्विकारण्याची मानसिकता तयार केली. 14/10/1956 ला नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर धम्माचा स्वीकार केला. लाखो लोकांना बुद्ध धम्माची दीक्षा दिली. परंपरेने बुद्ध धर्माची दीक्षा भिक्खू देत होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दरेक धम्म दीक्षा घेतलेल्यांना दीक्षा देण्याचा अधिकार दिला. 15/10/1956 ला भाषण करताना सांगितले की आता आपण बौद्ध झालो असुन भूतकाळातील जाती आम्ही विसरले पाहिजे. ज्याप्रमाणे नदी, नाले, धोंड्याचे पाणी सागराला मिळाल्यानंतर नदी-नाल्याच्या पाण्याची ओळख राहत नाही तर ते सागराचे पाणी असते. त्याचप्रमाणे बुद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर जातींचा अंत होतो. सर्व सामान बंधू भगिनी असतात. बौद्ध धम्माचा स्वीकार केल्यानंतर परंपरेने पूज्य असलेले देव देवता गावकुसाबाहेर फेकले. नविन वातावरणात बुद्ध धम्माचा प्रचार करून जीवन व्यापन करू लागले. बुद्ध विहाराची निर्मिती होऊ लागली. एक नविन संस्कृती निर्माण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दर रविवारला बुद्ध विहारात जाऊन सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिने विचार विनीमय करावे. बौद्ध विहार हे पूजा पाठाचे स्थान न होता सामाजिक समतेचे लढे लढणारे प्रेरणा स्थान व्हावे. आज बुद्ध विहार पूजापाठ करणारे स्थळ झाले आहे. बुद्ध विहार एकाने बांधावे कब्जा दुसऱ्यांनी करावे गटबाजीचे ठिकाने झाले आहे. बुद्ध भिक्खू जनतेला पुजापाठात गुंतवून धार्मिक वातावरणांत बुडवले जाते. एका जातीच्या पलीकडे धम्म जात नाही व तसे प्रयत्न केले जात नाही. भिक्खू सुद्धा सर्व जातींचा समावेश बुद्ध धम्मात अंतर्भाव होईल या दृष्टिने प्रयत्न केला जात नाही. भटके आदिवासीं लोकांपर्यंत बुद्ध धम्म नेण्याची जबाबदारी भिक्खू वर असताना फक्त पूर्वीच्या महार जातीपूरता मर्यादित आहे. ज्या अनुसूचित जाती आरक्षणाचा लाभ घेतात ते सुद्धा बुद्ध धम्माचा स्वीकार करित नाही. तर हिन्दु धर्माच्या आहारी जाऊन ती व्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न करीत असतात. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रयत्न होता की सर्व सामाजिक शोषित जाती बुद्ध धम्माच्या सोबत येऊन मानव मुक्तीच्या लढ्याला तीव्र करून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, समान न्याय हे जीवनमूल्ये वर आधारित समाज व्यवस्था निर्माण करावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्याची जबाबदारी असणारे भिक्खू या प्रयत्नात दिसत नाही. तर विहारात परित्राण करण्यास प्रवृत्त केले जाते. परत पूजापाठ करण्यात अडविले जात आहे. याचा विचार करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की बुद्ध धम्मात गढूळ पाणी जमा झाले त्याला नाली करून शुद्ध पाणी करायेचे या दिशेने प्रयत्न होत असल्याचे दृष्टिस पडत नाही. ■■



विनायकराव जामगडे
मो.9372456389

### संविधानिक आरक्षणाचे उपर्गीकरण पुस्तक प्रकाशीत

# उपवर्गीकरण करता येऊ शकत नाही : डॉ. प्रदिप आगलावे

नागपूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज संशोधन संस्थेवतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतीक सभागृह (कॉन्फरन्स हॉल), ऊरेवला कॉलनी, वर्धा रोड, नागपूर येथे 'अनुसूचति जातीच्या संविधानिक आरक्षणाचे उपर्गीकरण' पुस्तकाचे प्रकाशन आंबेडकरी विचारवंत डॉ. प्रदिप आगलावे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. दिलीप काकडे, पुणे, पुस्तकाचे लेखक डॉ. मुकेश दुपारे तर प्रमुख उपस्थिती अनिल काणेकर, अध्यक्ष बहुजन हिताय संघ, लांखादूर व सिध्दार्थ खोब्रागडे मंचावर उपस्थित होते.



पुस्तकाचे लेखक डॉ. मुकेश दुपारे म्हणाले की, मी संशोधन करतो, संशोधकांना मार्गदर्शन करतो, कोमटी व इतर जातीचे इतर मागासवर्गात समाविष्ट करण्याकरिता संशोधन केले आहे. उपवर्गीकरणात महार व धर्मांतरीत बौध्दांना फायदा होत असूनही इतर जातींचे कायमचे नुकसान होऊ नये त्यांच्या जेवणात माती मिसळविल्या जाऊ नये म्हणून या वर्गाने बुध्दांचा मानवतावाद व डॉ. बाबासाहेबांची विचारधारा स्वीकारल्यामुळे हा वर्ग उपवर्गीकरण नको म्हणतो. 1 ऑगस्ट 2024 ला सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर आम्ही प्रत्यक्ष संधोधनाला सुरूवात केली. खर म्हणजे संविधानिक समिती किंवा वैधानिक समिती आम्हाला नको असुन विशेष समितीची ज्यात शासन-प्रशासन, न्यायालयाचे न्यायमुर्ती व विविध जातीतील विद्वान लोक असावे अशी मागणी केली... या संशोधनाचे विशेष म्हणजे आम्ही नाविण्यपूर्ण इनक्युबेट आणि थॉट थेरपी प्लॅटफॉर्म चा आधार घेतला. या संशोधनात आम्ही शासनाला सात प्रकारे उपवर्गीकरण करता येऊ शकत असल्याचे सुचविले आहे. डॉ. आगलावे यांनी लेखकाचे अभिनंदन केले. अध्यक्षीय भाषणात अर्डॅ. दिलीप काकडे म्हणाले की नैसर्गिकरित्या उपवर्गीकरण मान्य होऊच शकत नाही. प्रस्थापितांच्या दबावातून जबदरस्तीने उपवर्गीकरणाची मागणी होत आहे. उपवर्गीकरण होत असेल तर अनुसूचित जातीच्या सर्व बांधवांनी सर्तक राहण्याची गरज आहे. जर अनुसूचित जातीच्या प्रमुख जातींना उपवर्गीकरणाबाबत समजावून सांगू शकलो तर वर्गीकरण होणार नाही. आपल्याला एकसंघ राहून एकीची ताकद दाखवून देण्याची गरज आहे. उपवर्गीकरणाचा स्वार्थी राजकारणी लोकांचा संबंध नाही त्यामुळे राजकारणी लोकांच्या ठराविक उद्देशाकडे लक्ष न देता आपल्या भविष्याचा, पुढील पिढींचा विचार करण्याची गरज आहे.

> डॉ. बाबासाहेबांनी लहान-लहान अस्पृश्य जातीला एकत्रित करून संविधानार्तंगत आरक्षणाला संविधानिक दर्जा प्राप्त करून दिला असल्यामुळे उपवर्गीकरण करता येऊ शकत नाही. कारण अनुसूचित जातीला मिळालेले आरक्षण हे नऊ कसोट्यांवर आधारित असून प्रमुख व महत्त्वाची कसोटी अस्पृश्यता होती. 'फोडा आणि राज्य करा' ही नीती इंग्रजींची नसून ती ब्राम्हणांची नीता आहे, उपवर्गीकरण हा जाती-जातीमध्ये विभागणी करून भांडण लावण्याचे षडयंत्र आहे. त्यामुळे त्यांनी समस्त अनुसूचित जातींनी जागृत राहावे.
> 
> – डॉ. प्रदिप आगलावे

प्रस्थापित सत्तेचा आरक्षण संपविण्याचा खेळ आहे असल्याचे सांगितले.

प्रमुख अतिथी अनिल काणेकर यांनी पुस्तकाला व लेखकाला शुभेच्छा देऊन अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक सुधीर चालखुरे यांनी तर आभार सिध्दार्थ खोब्रागडे यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विविध जातीतील कार्यकर्ते, नोकरदार व जाणकारवर्ग उपस्थित होते. कार्यक्रमातनंतर मोठ्या संख्येने उपस्थीत जाणकारांनी पुस्तकाची खरेदी करण्यात केली




## विश्वशाती बुद्ध विहार

पिवळी नदी, कामठी रोड, नागपूर येथे विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबविण्यात येतात .

संवाद मित्र,
भदंत नागदिपंकर महास्थविर
9423605550

## महत्वाचे

### बकरी ईद निमित्त रक्तदान



नागपूर : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व मुस्लिम सत्यशोक मंडळ, सातारा आयोजित 'बकरी ईद निमित्त रक्तदान' उपक्रमास भरघोस प्रतिसाद शनिवार बकरी ईद (ईद उल अदहा) हा त्यागाचा, बलिदानाचा अर्थात कुर्बानीचा संदेश देणारा सण, आनंदाने सादरा करणेसाठी काल सुसंगत बदल करून 'रक्तदान' करून मानवतेचा खरा विचार समाजात देणेसाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती राज्य भर गेली 11 वर्ष सतत 'रक्तदान उपक्रम' राबवते त्याबरोबर मुस्लिम सत्यशोधक मंडळ या कामी अग्रेसर आहे. सातारा येथे सकाळी 10-1 या वेळेत 20 जणांनी रक्तदान केले. माऊली ब्लड बँक यासाठी कायम सहकार्य करते. आज या उपक्रमात मोहसीन शेख,ब श्रेयंषू माने, प्रवीण माने, शामली माने, प्रशांत पोतदार, उदय चव्हाण, इंद्रजीत कदम, डॉ. हमीद दाभोलकर, डॉ. प्रदीप झनकर, डॉ. दिपक माने, महादेव इंगळे, शाहरुख शिकलगार, सार्थक पाटील, इंद्रजीत कदम इ.लोकांनी सहभाग घेतला. याचे सर्व नियोजन मोहसीन शेख व वंदना माने यांनी केले.

### तेलुगु यादव समाज यांचा संगीतमय नजराणा



संवाद मित्र ज्योत्स्ना बनसोड, नागपूर : तेलुगु यादव समाज यांचा गीतांचा संगीतमय कार्यक्रम नुकताच पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन तेलगू यादव सोसायटीतील गायक कलावंताने केले असून, संचालन सचिन शिवपुर यांनी केले त्यासाठी रश्मी ममदालने, संगीता मडपूला मदत केली. अनेक नामवंत कलावंताने सदाबहार गीत गायन करून समा बांधली. गायकांमध्ये संतोष बामेडकर, प्रवीण भंडारी, मनोज नेल्लोर, मनोज नन्नपाग, राहुल कालाकोटी, करुणा यादव, खुशबू बामडेकर, आनंद नागरकर, आणि सुचित कलाकोटी यांनी प्रत्येकी दोन गीतांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून आलिशा मोहम्मद गायकांच्या मध्ये उपस्थित होत्या. या गीतांच्या संगीतमय कार्यक्रमाला नेहमीप्रमाणे मोठ्या संख्येने प्रेक्षकांची उपस्थिती होती. आणि सदाबहार संगीतमय गीतांचा आस्वाद घेतला.

### शास. औ. प्र. संस्थेत शिवराज्याभिषेक दिन साजरा



चंद्रपूर : ऋषी अगस्त शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चंद्रपूर येथे गेल्या 6 जून रोजी शिवराज्याभिषेक दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन सिपेट सभागृहात करण्यात आले. या कार्यक्रमाचे व्हिडिओ द्वारे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते झाले. यावेळी मंगल प्रभात लोढा, मनीषा वर्मा यांचा संदेश उपस्थितांना ऐकविण्यात आला. यावेळी ॲड. अजित पांडे यांचे तर ॲड. आशिष मुंदडा यांचे मार्गदर्शन झाले. यावेळी आय.एम.सी. सदस्य ॲड. नरेश मडावी, मयूर चहारे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य आर. बी. वानखेडे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निदेशक बंडोपंत बोढेकर यांनी केले. संचालन निर्देशक अनिता ढेंगेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन गटनिदेशक एन.एन. गेडकर यांनी केले.

# बुद्धाच्या धम्मात नैतिकतेला महत्वाचे स्थान : महानागरत्न



नागपूर : देशात विषमता नष्ट करून बंधुभाव निर्माण करणे हे बाबासाहेबांचे स्वप्न होते. बुद्धांचा धम्म हा माणूस आणि माणसाचे मन यावर आधारित आहे. बुद्धाच्या धम्मात नैतिकतेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. बाबासाहेबांनी संविधानाच्या उद्देशीकेत आणि अनेक अनुच्छेदात या वैश्विक मूल्यांचा समावेश केला आहे. जो पर्यंत देशातील प्रत्येक व्यक्ती संवैधानिक नैतिकतेचे पालन करत नाही तो पर्यंत देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही, असे प्रमुख अतिथी महानागरत्न यांनी 'वंदना संघाचा धम्मघोष' या मासिकाचे विमोचन करताना विचार व्यक्त केले. त्यांनी धम्मघोष मासिकाचे विमोचन झाल्याची घोषणा केली. धम्मघोष या मासिकाची सुरुवात 18 वर्षापूर्वी झाली. धम्मघोष चा प्रत्येक अंक हा प्रासंगिकतेवर राहत असून धम्मघोष मासिकाच्या आजपर्यंतच्या प्रवासाविषयी मासिकाचे संपादक प्रा. देवीदास घोडेस्वार यांनी सभेला माहिती दिली. जून 2025 चा अंक बौद्ध मानसशास्त्र : मन आणि चेतना यावर आधारित असून बौद्ध तत्वज्ञानामुळे बुद्ध आणि धम्माचे वालपणापासून आकर्षण असल्याचे अतिथी संपादक क्षितीज वालदे यांनी विचार व्यक्त केले. शिक्षण घेतांना येणाऱ्या अडचणी सांगून आपला निर्धार पक्का असल्यास आपण ठरविलेले ध्येय प्राप्त करू तो असे विद्यार्थिनी रोहिणी निंबार्ते यांनी विचार व्यक्त केले. विलास भोंगाडे, दामोदर लोखंडे यांनी शकता धम्मघोष मासिकाच्या वैचारिकतेवर आपले मत व्यक्त केले. या प्रसंगी गोविंद ढोके यांनी वंदना संघाला रुपयाचे आर्थिक सहाय्य करून ते धम्मघोष मासिकाचे आश्रयदाते बनले. विठ्ठलराव डांगरे 15 हजार रुपयाचे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. देवीदास राऊत यांच्या समापण गाथेने कार्यक्रमाची सांगता केली. सभेला अनेक गणमान्य व्यक्ती उपस्थित होते.

# डॉ. खानोरकरांच्या 'संजोरी' ग्रंथाचे प्रकाशन



चंद्रपूर : रशियातील लोकनृत्य पाहायला रशियन नसतात, बाहेरचे पर्यटक असतात.मी नंदुरबार पासून देश, विदेशातील गडचिरोलीच्या सिरोंच्यापर्यंतचे आदिवासी पाहिले.ते गरिब, दरिद्री, कष्टकरी आहेत पण ते दुःखी, खिन्न, निराश नाहित. त्यांच्या पोरांच्या तोंडावर माशा बसतात पण ते हसतात. चांगले लेख प्रा. खानोरकरांनी 'संजोरी'त लिहलेत अन् ते खास विनोदी शैलीत. 'संजोरी' म्हणजे धानचुरन्याचे खळ्यावरील शेवटच्या मोळ्याचे मटनाचे जेवन.या देशातले 84 टक्के हिंदू मांसाहारी आहेत. 'संजोरी' याही दृष्टीने महत्त्वाची आहे.जे इतिहास विसरतात त्याला भविष्य असत नाही. ग्रामीण, आदिवासी,झाडीपट्टीचे सौंदर्य 'संजोरी'त आहे. येथील झाडी माणसाची 'मोह' माया' हा अत्यंत सुंदर लेख. कधीतरी संचिताकडे आपण लक्ष दिले पाहिजे,ते यांनी दिले. तिखट ही चव आहे. हिरोती हा त्याचा खरा शब्द आहे. संवाद हे साध्य आहे, भाषा माध्यम आहे, म्हणून संवाद व्हावा. 'संजोरी' पुस्तकात राहू नये ती लोकांच्या मनात जावी. आपण या लोककलांपासून दूर चाललो आहोत म्हणून जागतिक पातळीवर लोककलांच्या वाटयाला दुर्दैव येते. असे बहूमूल्य विवेचन ज्येष्ठ संपादक व प्रसिद्ध कादंबरीकार प्रा. सुरेश द्वादशीवारांनी केले.

ते डॉ.धनराज खानोरकर लिखित झाडी लोककला, लोकसंस्कृतीच्या 'संजोरी' ग्रंथ प्रकाशनानिमित्त श्रमिक पत्रकार संघ भवनात बोलत होते.'संजोरी'चे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम चंद्रपूर जिल्हा झाडी बोली साहित्य मंडळाने आयोजित केला होता. विचारपिठावर भाष्यकार म्हणून नागपूरचे प्रसिद्ध लेखक व समीक्षक डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. श्याम मोहरकर, ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर व लेखक डॉ. धनराज खानोरकर, कवी अरुण झगडकर उपस्थित होते.यावेळी डॉ. मुनघाटे म्हणाले, 'संजोरी' हा प्राध्यापकांचा संशोधन पेपर नव्हे ते झाडीचे सांस्कृतिक संचित आहे. हे त्यांनी एक पुस्तकरुपाने दस्तऐवज म्हणून आपल्या सामोर आणले आहे. झाडीच्या लोककलांबद्दलचा असा पुस्तक पहिल्यांदाच आला. ते यमक, श्लेष वापरतात व स्वतःच नव्या म्हणींना जन्म देतात. हे प्रा. खानोरकरांचे काम बहुमूल्य असे आहे. 'तर डॉ. मोहरकरांनी, डॉ. खानोरकरांनी स्वतःची खास शैली घडवली असून बोलणे, लिहिणे, वागणे एका तालात आहे. 'संजोरी' वाचतांना याची पानोपानी प्रचिती येते, असे विचार मांडले.

प्रास्ताविकातून ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकरांनी झाडीबोलीचा इतिहास कथन केला. डॉ. खानोरकरांनी 'संजोरी' जन्माची कथा सांगीतली. संचालन चंद्रपूर झाडीबोली मंडळाचे अध्यक्ष कवी अरुण झगडकरांनी तर आभार कवी प्रशांत भंडारेंनी मानले. कार्यक्रमाला अनेक कवी, लेखक, विचारवंत श्रोते उपस्थित होते.

# गडकरींच्या महामार्गास भ्रष्ट वळण

### अडीचऐवजी एक फुटाचे डिव्हायडर म्हणून आमदाराने चक्क उखडून फेकले



वर्धा : सार्वजनिक बांधकाम मग ते पूल, रस्ते, इमारत, धरण किंवा अन्य कोणतेही असो, त्यात तक्रारी होतातच. पण अधिकारी सारवासारव करीत आरोपाने पडलेल्या भेगा हुशारीने बुजवून टाकतात, हे नेहमीचे चित्र. पण भ्रष्ट काम कसेही करून निपटवून टाकू, या गुर्मीत पण काही असतात. त्याला लोकप्रतिनिधीच रोखू शकतात, याचा दाखला म्हणजे हे प्रकरण होय.

आर्वी ते तळेगाव हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणात येतो. केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी खास मंजुरी दिलेला. आमदार दादाराव केचे यांनी पाठपुरावा केलेला. आठ वर्ष मंजुरीस झाले. वृक्ष तोड तक्रार म्हणून प्रकरण न्यायालयात. म्हणून तेव्हढा भाग सोडून उर्वरित काम सूरू करण्यात आले. हा मार्ग आर्वी नगरातून पण जातो. नगरपालिका ते बस स्टॅन्ड या अंतरातील रस्ता अचानक आकुंचित झाले. या रस्त्यावरील रोड डिव्हायडर अडीच फुटाचे निश्चित झाले होते. मात्र हस्तक्षेप झाला आणि हे डिव्हायडर चक्क एक फुटाचे करण्यात आले. त्यात संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांचे चांगभले होणार, हे उघड गुपित होते. काही भागात हे डिव्हायडर अडीच फुटाचे तर काही ठिकाणी केवळ एक फुटाचे. नागरिकांनी तक्रारी करणे सूरू केले. अखेर आमदार केचे यांचे लक्ष वेधण्यात आले.

अशी या रस्ते बांधकाम भ्रष्टाचारची चर्चा होताच राजकीय हस्तक्षेप ठरलेलाच. कारण सुमित वानखेडे हे आमदार होण्यापूर्वीच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मंजूर केलेला हा रस्ता. केचे यांच्या आग्रहामुळे. म्हणून केचे यांनी पुढाकार घेत बांधकाम पाहणी केली. तक्रारीत तथ्य दिसले आणि केचे अधिकाऱ्यांवर बरसले. ते म्हणाले की अधिकारी कामाची पाहणी कधीच करीत नाही. म्हणून काम निकृष्ट होत आहे. त्यांना दम दिला आहे. काम जसे मंजूर झाले तसेच व्हायला पाहिजे. ते होत नसल्याची खंत वाटते. संताप येतो. येत्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा लावून धरणार, अशी भूमिका आमदार केचे मांडतात.

# राजेंद्र झेंडे यांना महाराष्ट्र शासन डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार जाहीर



मुंबई : चेंबूर आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला मधील भीमसैनिक राजेंद्र झेंडे यांचे आंबेडकरी चळवळीत मोठे योगदान राहिले आहे. त्यांनी मराठवाडा विद्यापीठ नामांतरा साठी आमरण उपोषण केले होते. अश्वघोष कल्चर ॲड फोरमच्या वतीने त्यांनी दादू इंदुरीकर जीवन गौरव पुरस्कार सोहळ्याचे नियोजन करून जगाच्या पाठीवर साहित्याची दखल घेतली ते नामदेव ढसाळ, राजा ढाले, अभिनेते निळू फुले सारख्या अनेक नामवंत यांना दादू इंदुरीकर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. जयराम जाधव, राजेंद्र झेंडे यांनी देश पातळीवर आणि राज्य पातळीवर आयडॉल स्पर्धाच पेव फुटले असताना महाराष्ट्राचा भीम आयडॉल कोण ही उभ्या महाराष्ट्रातून गाण्याची स्पर्धा घेऊन महाराष्ट्राचा भीम आयडॉल कोण? या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्याचा 'लॉफिंग बुद्धा, हा कविता संग्रह फारच गाजला आहे. त्यांनी अब्राह्मणी अर्थनिती आणि फुले आंबेडकरी विद्यार्थी साहित्य संमेलनाचे नियोजन, केले आहे. त्याचे कवी, लेखक, अष्टपैलू असणारे व्यक्तिमत्व सतत समाज प्रबोधन करीत आहे. असे आंबेडकरी चळवळीतले सतत कार्यरत आणि सर्वांचे सुपरिचित असलेले आयु. राजेंद्र झेंडे साहेब यांना यंदाचा महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाचा समाजभूषण पुरस्कार जाहीर झाल्यांबद्दल झाल्याबद्दल आंबेडकरी चळवळीतील विविध क्षेत्रातील संघटना मधून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

## जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क
९३२५६२९६३५

# संविधानाच्या माध्यमातून अथक परिश्रमाने डॉ. बाबासाहेबांनी भारत राष्ट्र निर्माण केले : डॉ. अशोक राणा

### रमाई फाऊंडेशन, वर्धा द्वारा रमाई स्मृतीदिन-2025 व्याख्यान सत्र




वर्धा : रमाई स्मृतिदिन - 2025 निमित्य रमाई फाऊंडेशन, वर्धाद्वारा व्याख्यानाचे आयोजन सत्यनारायण बजाज सार्वजनिक वाचनालय, वर्धा येथे करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते डॉ. अशोक राणा (इतिहास व भाषा तज्ञ, यवतमाळ), प्रा. डॉ. हेमलता महिश्वर (माजी अध्यक्ष, हिंदी विभाग जामिया मिलीया इस्लामिया, दिल्ली) या उपस्थित होत्या व कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान धम्मा कांबळे (सामाजिक कार्यकर्ते, यवतमाळ) यांनी भूषविले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. अशोक राणा म्हणाले की, सम्राट अशोकांच्या काळातच फक्त भारत हे राष्ट्र होते. त्यापूर्वी ते कधीही राष्ट्र नव्हते. संविधानाच्या माध्यमातून अथक परिश्रमाने डॉ. बाबासाहेबांनी भारत राष्ट्र निर्माण केले. या राष्ट्रामध्ये दलित, आदिवासी, बहुजन, ख्रिश्चन, बौद्ध, मुस्लीम यांना संविधानामुळे समान दर्जा व अधिकार प्राप्त झाले आहेत. परंतु या सर्वांचे स्थान व अधिकार नाकारणाऱ्या व फक्त हिंदूंच्याच हितांना प्राधान्य देणाऱ्या हिंदू राष्ट्राचे डॉ. बाबासाहेब प्रखर विरोधक होते. त्यांचा राष्ट्रवाद हिंदुत्व विरोधी होता, तो स्त्रीवादी होता व कुणावरही अन्याय करणारा नव्हता.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या वक्त्या डॉ. हेमलता महिश्वर म्हणाल्या की, संविधानाच्या प्रास्ताविकेत नमूद केलेल्या समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता या प्रत्येक शब्दाच्या मूळाशी जावून सखोलपणे ही मानवी मूल्ये समजुन घेतली तरच व्यक्तीला खऱ्या अर्थाने माणूसपण, मनुष्यत्व प्राप्त होते. यातली स्वातंत्र्याची संकल्पना पूर्णपणे समजुन घेतली तरच लोकशाही अर्थपूर्ण होवून ती प्रस्थापित होवू शकते. कार्यक्रमाचे अध्यक्ष धम्मा कांबळे यानी अभ्यासपूर्ण विचार व्यक्त करतांना म्हणाले, संविधान हा खऱ्या अर्थाने मानवमुक्तीचा प्रलेख आहे, ते भारत राष्ट्र कसे असेल याचे व्हिजन डाक्युमेंट आहे. संविधानाच्या स्विकृती नंतर भारत राष्ट्र उदयास आले, हे राष्ट्र जिवंत राहिले, अबाधित राहिले तरच आपले संविधान लोकशाही मानवी मुल्ये मानवी सभ्यता जिवंत राहील. धार्मिक, वांशिक राष्ट्रवाद तीव्र झालेल्या भारत राष्ट्र विरुद्ध हिंदू राष्ट्र या वर्तमानात पेटलेल्या संघर्षावर डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत सार्वभौम भारत राष्ट्रवाद निर्माण करणे हाच एकमेव व योग्य पर्याय आहे व त्यासाठी सर्व भारतीयांनी कटिबद्ध असले पाहिजे. अशा राष्ट्रात प्रत्येक व्यक्तीस्वतंत्र असेल आणि सर्वांना भौतिक व ऐहिक बाबींसंदर्भात समसमान राष्ट्रीयत्व प्रदान होईल.

कार्यक्रमारंभी पाहुण्यांच्या हस्ते माता रमाईच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. रमाई फाऊंडेशनच्या वतीने पाहुण्यांचा पुष्पगुच्छ, शॉल व सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. ज्ञानेंद्र मुनेश्वर, प्रस्ताविक सरिता पखाले तर आभार प्रदर्शन जितेश कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता, यशस्वीतेकरीता रमाई फाऊंडेशनच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले.

# खान सुरक्षा उपनिदेशक पदावर नियुक्तीबद्दल नितीन पारडकर यांचा सत्कार



हिंगणा : भारत सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या अंतर्गत खान सुरक्षा महानिर्देशालय (डिजीएमएस), धनबाद येथे खान सुरक्षा उपनिदेशक (यांत्रिकी) पदासाठी संघ लोकसेवा (युपीएससी) आयोगाच्या वतीने नितीन बबनराव पारडकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्याबद्दल वानाडोंगरी नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या वैभवनगर, शिक्षक-कॉलनी येथिल रहिवासी बबनराव पारडकर यांचा मुलगा नितीन यांचा गावातील नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. सर्वप्रथम एचटीकेबिएस क्लबचे संचालक व सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक राजेश भुते यांच्या हस्ते शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते विनायक इंगळे गुरुजी, बबनराव पारडकर, रामदास गिरडकर, रितेश गिरडकर, शिवम दांडेकर, गणेश दांडेकर, सोहम पारडकर, सेजल पारडकर, वीणा गिरडकर, रंजना दांडेकर, अनुष्का पारडकर व निकिता जुमडे उपस्थित होते. 129 मुलांनी ही परीक्षा दिली. त्यापैकी फक्त 21 लोकांची निवड करण्यात आली असून नितीन पारडकर यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. या नियुक्तीबद्दल नितीनचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. यापूर्वी नितीन हा MOIL Limited, Nagpur भारत सरकारच्या स्टील मंत्रालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील, सार्वजनिक क्षेत्रातील सरकारी उपक्रम कंपनी मॉईल (MOIL) मधील विभिन्न खाणीमध्ये एकूण 20वर्ष कार्य केले. सन-2005 पासून आतापर्यंत त्याने असिस्टंट जनरल मॅनेजर, मेकॅनिकलच्या पदावर अतिशय उत्तम काम केले. नितीन पारडकर यांनी विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (vnit) नागपूर येथून पदवी पूर्ण केली. नुकतीच एमबीए ही पदवी प्राप्त केली असून पिएचडीसाठी तयारी करीत आहे. मिळालेल्या यशाचे श्रेय त्यांनी आईबाबा, गुरुजन व इतरांना दिले.

## स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648